***

SUNDAR KAND CHOKI KAHANIYA (Marathi)

****

कथा-सूची

अनु.	विषय	पृष्ठ	अनु.	विषय	पृष्ठ
१)	भगवंतावर विश्वास	१	१७)	कासव गुरू	२३
२)	दुष्ट मुलगा	३	१८)	बगळा उडाला	२४
३)	जशास तसे	५	१९)	खरे बोला	२६
४)	स्वातंत्र्याचे सुख	६	२०)	सर्वांत मोठा धर्मात्मा	२८
५)	दयेचा महिमा	७	२१)	नरकाची यात्रा	३०
६)	सिंहाची थप्पड	८	२२)	डॉक्टरसाहेब मार खातात	३१
७)	कोकराची चूक	९	२३)	मनुष्य की जनावर !	३३
८)	एकजुटीचे फळ	१०	२४)	समाधानाचे फळ	३४
९)	संगतीचा परिणाम	१२	२५)	असभ्य आचार्य	३५
१०)	अस्वलाचे शहाणपण	१३	२६)	सर्वस्व दान	३६
११)	करावे तसे भरावे	१४	२७)	जेव्हा डाकू रडला	३७
१२)	उपकाराची फेड	१५	२८)	मी मनुष्य बनेन	३८
१३)	उपकार	१७	२९)	शिवी जवळच राहिली	३९
१४)	ढोंगाचा परिणाम	१९	३०)	मोठ्यांचे म्हणणे ऐका	४०
१५)	बाबाजी गेले चोरी करायला	२०	३१)	स्वच्छता	४२
१६)	मला माणूस पाहिजे	२२	३२)	श्रद्धेशिवाय सिद्धी नाही	४४

ॐ श्रीपरमात्मने नमः

सुंदर कथा

भगवंतावर विश्वास

थंडीचे दिवस होते. संध्याकाळ झाली होती. आकाशात ढग जमले होते. एका कडुलिंबाच्या झाडावर बरेच कावळे बसले होते. ते सर्व वारंवार काव-काव करीत होते आणि एकमेकांशी भांडत होते. त्याच वेळी एक लहानशी मैना आली आणि त्याच झाडाच्या एका फांदीवर बसली. तिला पाहताच काही कावळ्यांनी तिच्यावर हल्ला केला.

बिचारी मैना म्हणाली - 'ढग खूप आले आहेत, म्हणून आज लवकर अंधार झाला. मी माझे घरटे विसरले. मला आज रात्रभर येथेच बसून राहू द्या.

कावळे म्हणाले - 'नाही, हे झाड आमचे आहे. तू येथून पळ काढ.'

मैना म्हणाली - 'सर्व झाडे तर देवाची आहेत. ह्या थंडीत जर पाऊस पडला आणि गारा पडल्या तर देवच आपले प्राण वाचवू शकेल. मी फारच लहान आहे, तुमची बहीण आहे. माझ्यावर तुम्ही दया करा आणि मला येथेच राहू द्या.

कावळे म्हणाले - 'आम्हांला तुझ्यासारखी बहीण नको. तू देवाचे नाव फार घेतेस तर त्याच्या भरंवशावर येथून जात का नाहीस ? तू गेली नाहीस तर आम्ही सर्वजण तुला मारू.'

कावळे तर भांडखोर असतातच. ते संध्याकाळी जेव्हा झाडावर बसू लागतात तेव्हा आपापसात भांडल्याशिवाय त्यांना राहवत नाही. ते एकमेकांना मारतात आणि काव काव करून भांडतात. कोणत्या फांदीवर कोणत्या कावळ्याने रात्री बसावे, हे लवकर ठरत नाही. त्यामुळे वारंवार त्यांच्यात भांडणे होतात. मग दुसऱ्या एखाद्या चिमणीला ते आपल्या झाडावर तरी कसे बसू देतील ? आपसातील भांडणे सोडून ते मैनेला मारण्यास धावले.

कावळे काव-काव करीत आपल्यावर चालून आल्याचे पाहून बिचारी मैना तेथून उडून गेली आणि थोड्या दूरवर जाऊन एका आंब्याच्या झाडावर बसली.

रात्री वादळ आले. ढग गरजले आणि मोठाल्या गारा पडू लागल्या. मोठ्या बटाट्याएवढ्या गारा फटाफट बंदुकीच्या गोळ्यांप्रमाणे पडत होत्या. कावळे काव-काव असे ओरडले. इकडे-तिकडे जरासे उडाले. पण गारांच्या माऱ्यामुळे जखमी होऊन सगळेच जमिनीवर पडले. बरेचसे मरून गेले.

ज्या आंब्यावर मैना बसली होती, त्या आंब्याची एक मोठी फांदी वादळाने तुटून पडली. ती आतून सडल्यामुळे पोकळ झाली होती. फांदी तुटल्यावर झाडाच्या बुंध्यात एक ढोल तयार झाली होती. छोटी मैना तीत घुसली. तिला एकसुद्धा गार लागली नाही.

सकाळ झाली. दोन घटका दिवस वर आल्यावर छानदार ऊन पडले. मैना त्या ढोलीतून बाहेर आली. तिने पंख पसरले, किलबिल करून देवाला नमस्कार केला आणि उडाली. जमिनीवर गारांनी जखमी झालेल्या कावळ्याने मैना उडत असताना पाहून मोठ्या मुष्किलीने म्हटले - 'मैनाताई ! तू कोठे राहिली होतीस ? तुला गारांच्या मारातून कोणी वाचविले ?'

मैना म्हणाली - 'मी आंब्याच्या झाडावर एकटी बसले होते आणि देवाची प्रार्थना करीत होते. दुःखात पडलेल्या निराधार जीवाला देवाशिवाय दुसरे कोण वाचवू शकणार ?'

पण देव काही फक्त गारांपासून वाचवीत नाही आणि फक्त मैनेलाच वाचवीत नाही. जो जो देवावर विश्वास ठेवतो आणि त्याची आठवण करतो, त्याला देव सर्व संकटातून मदत करून वाचवितो आणि त्याचे रक्षण करतो.

★ ★ ★

दुष्ट मुलगा

पावसाळ्याचे दिवस होते. तलाव काठोकाठ भरला होता. बेडूक काठावर बसून एका सुरात डराँव डराँव करीत होते. काही मुले स्नान करू लागली. पाण्यात उडी घेऊन पोहू लागली. त्यांपैकी एकाने दगड घेतला व एका बेडकाला मारला. बेडूक उडी मारून पाण्यात गेला. बेडकाच्या उड्या पाहून मुलाला खूप मजा वाटली. तो पुन्हा पुन्हा त्याला दगड मारू लागला व उड्या मारताना पाहून हसू लागला.

दगड लागल्यामुळे बिचाऱ्या बेडकाला जखम झाली होती. त्याला जर माणसाची भाषा बोलता आली असती तर त्याने मुलाला खात्रीने विनंती केली असती आणि कदाचित त्याला शिव्यासुद्धा दिल्या असत्या; पण तो बिचारा काय करणार ? दगड लागताच प्राण वाचविण्यासाठी तो पाण्यात उडी मारी. दु:ख सोसण्याशिवाय त्याच्याजवळ काही उपायच नव्हता.

अशाप्रकारे खेळात बेडकांना दगड मारणे, किडे, मुंगळे, फुलपाखरे यांना त्रास देणे किंवा त्यांना मारून टाकणे हे मोठे पाप आहे, हे त्या मुलाला माहीत नव्हते. पाप करणाऱ्यास फार दु:ख भोगावे लागते, मेल्यावर यमदूत त्याला धरून नरकात नेतात. तेथे त्याला खूप त्रास सोसावा लागतो. बेडकांना दगड मारणे त्याला खेळ वाटत होता. तो पुन्हा पुन्हा दगड मारतच होता.

'याला पकडून घेऊन चला'. मुलाने मागून आवाज ऐकताच दचकून मागे पाहिले. तीन यमदूत उभे होते. ते काळे कुट्ट, लाल डोळ्यांचे, मोठाले दात, तिरपे नाक, हातात जाड दंडुके आणि दोरी. त्यांना पाहून मुलगा भ्याला. त्याने मित्रांना बोलावले. पण तेथे कोणी नव्हते. तो खेळत असताना बाकीची मुले स्नान करून घरी गेली होती.

'पकडा याला !' एका यमदूताने दुसऱ्यास म्हटले.

'हा तर शेणकिड्यासारखा घाणेरडा आहे'. दुसऱ्या यमदूताने तोंड वाकडे करून त्याला पकडायचे नाकारले.

'मी याला हातही लावणार नाही. हा फार नीच आहे. माझे हात मळतील', तिसरा म्हणाला.

'तर मग याला दोरीने बांधून फरफटत घेऊन चला', पहिल्याने सल्ला दिला. मुलगा हे सर्व ऐकत होता. त्याचा जणू जीव निघून चालला होता. मोठ्या धैर्याने त्याने विचारले - 'मला कोठे नेणार ?'

'नरकात. जेथे सर्व पाप्यांना जिवंतपणीच तेलात तळतात भज्याप्रमाणे.' एक यमदूत जोरात म्हणाला.

'भज्यासारखा ?' मुलाला आई घरी भजी तळते, ते आठवले.

'बापरे ! मी भज्यासारखा तळला जाणार ?'

'मी तुमचे काय नुकसान केले आहे ? मला सोडा'. मुलाने पाया पडून विनंती केली.

'तू पापी आहेस. तू मोठा नीच आहेस, पण यापुढे जर कधी पाप करणार नसशील तर सोडून देऊ'. मोठा यमदूत म्हणाला.

'मी शपथ घेतो, कधी पाप करणार नाही'. त्याने विचार न करता दोन्ही कान पकडून प्रतिज्ञा केली. यमदूत ताबडतोब गुप्त झाले. मुलगा धावत धावतच घरी आला. त्याने आपल्या आईला सर्व हकीकत सांगितली आणि विचारले - 'आई ! मी कोणते पाप केले ?'

आई म्हणाली - 'बाळ ! निरपराध बेडकांना मारमारून तू मोठे पाप करीत होतास. कोणाही निरपराध्यास दुःख देणे महापाप आहे'.

'परपीडा सम नहिं अधमाई ॥' दुसऱ्याला दुःख देण्यासारखा दुसरा अधमपणा नाही.

जशास तसे

एकदा म्हैस आणि घोडा यांच्यांत भांडण झाले. दोघे एकाच जंगलात राहात होते. जवळ-जवळ चरत असत आणि एकाच रस्त्याने जाऊन एकाच झऱ्याचे पाणी पीत असत. एक दिवस दोघांत मारामारी झाली. म्हशीने आपल्या शिंगांनी मारून घोड्यास हैराण केले.

घोड्याने पाहिले की, आपण म्हशीला जिंकू शकत नाही. तेव्हा तो तेथून पळाला. एका माणसाजवळ आला. घोड्याने त्याला मदत करण्याची विनंती केली. मनुष्य म्हणाला, 'म्हशीची शिंगे मोठाली आहेत. ती फार बलवान आहे. मी तिला कसा जिंकू शकेन ?'

घोड्याने समजावले, 'माझ्या पाठीवर बसा. एक मोठी काठी घ्या. मी जोराने धावत जाईन. तुम्ही तिला काठीने झोडपून हैराण करा. मग दोरीने बांधून टाका.'

मनुष्य म्हणाला, 'मी तिला बांधून काय करू' ?

घोडा म्हणाला, 'म्हैस फार गोड दूध देते, तुम्ही ते पीत जा.'

मनुष्याने घोड्याचे म्हणणे कबूल केले. म्हैस बिचारी मार खाऊन जेव्हा खाली पडली, तेव्हा त्याने तिला बांधून टाकले. काम झाल्यावर घोडा म्हणाला, 'आता मला सोडून द्या, मी चरायला जाईन.'

मनुष्य जोरजोरात हसू लागला. तो म्हणाला, 'मी तुलासुद्धा बांधून टाकतो. मला माहीतच नव्हते की, तुझ्या पाठीवर बसल्यावर तू माझ्या प्रवासाच्या कामी येऊ शकतोस. मी म्हशीचे दूध पिईन आणि तुझ्या पाठीवर चढून प्रवास करीन.'

घोडा खूप रडला, पस्तावला. आता काय होणार होते ?

म्हशीशी त्याने जसा व्यवहार केला, त्याचे फळ त्याला स्वत:लाच भोगावे लागले.

'जो जस करई सो तस फलु चाखा', जो जसे करील तसे त्याला फळ मिळेल.

★ ★ ★

स्वातंत्र्याचे सुख

एके दिवशी एक उंट आपल्या नाकातील वेसण कशीतरी सोडवून आपल्या मालकाच्या घरातून पळून गेला. तो खूप दूरवर पळत गेला. रस्त्यात एक नदी लागली. आता पुढे जाण्याचा रस्ता बंद झाला. पळत येत असताना त्याने रस्त्यात लागलेली हिरवीगार शेते, पानांनी भरलेली झाडी, मोठी निंबाची झाडे ओलांडली होती. त्याला वाटलं असतं, तर मान उंचावून पोटभर पाला तो खाऊ शकला असता, पण तो तेथून बराच दूर पुढे पळत आला होता.

मागे मोठी टेकडी, समोर नदीचे मोठे पात्र आणि दोन्हीकडे दूरपर्यंत वाळूच वाळू. कोठेही हिरवळीचे नाव नव्हते. उंट बिचारा तेथे थांब थांब थांबला व शेवटी थकून खाली बसला. भीतीमुळे तोंडसुद्धा चालवू शकत नव्हता. कारण आपला मालक आपल्याला पकडून तर नेणार नाही, ही त्याला भीती होती. त्याला खूप भूक लागली. तेथे पाण्याशिवाय काहीच नव्हते. त्यामुळे तो अगतिक होऊन गेला.

दोन-तीन दिवस असेच निघून गेले. बिचारा उंट भुकेने अगदी अर्धमेला झाला. त्याचवेळी एक कावळा तेथे आला. त्याला उंटाची दया आली. तो म्हणाला, 'उंट दादा ! मी उडत जातो, त्या मार्गाने तुम्ही माझ्या मागे या. मी तुम्हांला हिरव्या शेतापर्यंत पोहोचवून देईन'.

उंटाला फार आनंद झाला. त्याने कावळ्याला धन्यवाद दिले व तो जायला तयार झाला. त्याचवेळी त्याला एक आठवण झाली आणि त्याने विचारले - 'बंधू ! त्या शेतात कधी मनुष्य तर येत नाही ना ?' कावळा हसला. तो म्हणाला, 'अहो ! हिरवे शेत माणसाशिवाय कसे होईल' ?

'तर मग मी येथेच बरा आहे'. उंट नाराजीने म्हणाला.

'येथे तर तुम्ही उपाशी मराल'. कावळ्याने समजावले.

'पण येथे कोणी नाकात दोरी घालून त्रास तर देणार नाही !' उंटाने संतोषाने व गर्वाने उत्तर दिले.

खरे आहे की, 'पराधीन सपनेहूँ सुख नाही' - परतंत्र माणसाला स्वप्नातही सुख मिळत नाही.

★ ★ ★

दयेचा महिमा

एक फासेपारधी होता. चिमण्यांना, पक्ष्यांना जाळ्यात पकडून किंवा बांबूला गोंद लावून त्यात त्यांना चिकटविणे व पकडून विकणे, हेच त्याचे काम होते. एके दिवशी तो फासेपारधी आपली चादर एका झाडाखाली ठेवून मोठा वेळू घेऊन, पक्षी येण्याची वाट पाहात बसला. तितक्यात एक टिटवी ओरडत आली आणि त्या शिकाऱ्याच्या चादरीत लपून बसली.

टिटवी हा पक्षी असा नाही की तो कोणी विकत घेऊन पाळील. फासेपारधी तिला तेथून हाकलून देण्याच्या विचाराने उठला. त्याचवेळी तेथे लहान पक्ष्यांना मारणारा ससाणा पक्षी त्याला दिसला. त्याने ताडले की, हा ससाणा टिटवीच्या मागे लागला असावा. म्हणूनच ती आपल्या चादरीखाली लपली. त्याला तिची दया आली. त्याने ढेकळे मारून ससाण्याला पळवून लावले. ससाणा गेल्यावर टिटवीदेखील चादरीतून बाहेर आली आणि उडून गेली.

काही दिवसांनी तो फासेपारधी आजारी पडला आणि मेला. यमदूत त्याला यमपुरीस घेऊन गेले. तेथे कोठे मोठ्या कढईत तेल उकळत होते, तर कोठे आग भडकलेली होती. पापी लोक आगीत भाजले जात होते, तेलात उकळले जात होते. कोठे कुऱ्हाडींनी तोडत होते. असा बराच छळ केला जात होता. शिकारी तेथे पोहोचताच शेकडो पक्षी जमले व म्हणू लागले की, 'याने आमचा काही अपराध नसताना आम्हांला पकडले व विकून टाकले. आम्ही याचे डोळे फोडू, लचके तोडून याचे मांस खाऊ.'

फासेपारधी भीतीने थर थर कापू लागला. त्याचवेळी तेथे एक टिटवी आली. तिने यमराजास हात जोडून म्हटले, 'महाराज ! याने ससाण्यापासून माझे प्राण वाचविले आहेत. याला क्षमा करा.'

यमराज म्हणाले, 'हा मोठा पापी आहे. सर्व पक्षी याला टोची मारतील. मग याला जाळले जाईल व नंतर कुऱ्हाडीने कापले जाईल. ही लहानशी टिटवी याला वाचवायला आली आहे. याने एकदा तिच्यावर दया केली आहे. म्हणून त्याला एकदा पृथ्वीवर परत जाऊ द्या आणि एक वर्ष जगू द्या'.

यमदूतांनी फासेपारध्याचा जीव त्याला परत दिला. त्याच्या घरचे लोक

त्याचे शरीर स्मशानात घेऊन गेले होते आणि चितेवर ठेवणार होते. ते रडत होते. तितक्यात तो जिवंत झाला, बोलू चालू लागला. घरचे लोक आनंदित झाले आणि त्याला घेऊन घरी आले.

यमराजाचे बोलणे फासेपारध्याच्या चांगलेच लक्षात होते. त्याने पक्षी पकडणे सोडून दिले व आपल्या भावांनाही सोडावयास लावले. तो मजुरी करू लागला. सकाळ-संध्याकाळ पक्ष्यांना दाणे टाकू लागला. पुष्कळ पक्षी ते खात असत. आता रोज तो देवाची प्रार्थना करी. नामजप करी. त्यामुळे त्याची सर्व पापे नाहीशी झाली. एका वर्षानंतर जेव्हा तो पुनः मेला, तेव्हा देवांचे विमान आले व त्याला स्वर्गात घेऊन गेले. तुम्हीदेखील कोणत्याही जीवाला दुःख देऊ नये. सर्व जीवांवर दया करावी. जो जीवांवर दया करतो, त्याच्यावर देव प्रसन्न होतो.

परहितसरिस धरम नहिं भाई।
परपीडासम नहिं अधमाई॥

दुसऱ्याचे कल्याण करण्यासारखा धर्म नाही आणि दुसऱ्यास पीडा देण्यासारखा दुसरा अधमपणा नाही.

सिंहाची थप्पड

एक ब्राह्मण होता. फार गरीब आणि सुशील. एकदा देशात दुष्काळ पडला. मग त्या ब्राह्मणाला कोण शिधा देणार आणि पूजा पाठ तरी करवणार ? बिचाऱ्याला कित्येक दिवस जेवणच मिळाले नाही. त्याने विचार केला, भुकेने मरण्यापेक्षा तर जीव देणे बरे. तो जीव देण्याच्या विचाराने जंगलात गेला. मरणापूर्वी त्याने शुद्ध मनाने देवाचे नाव घेतले आणि प्रार्थना केली. तितक्यात त्याला एक सिंह दिसला. ब्राह्मण म्हणाला, 'मी तर मरण्यासाठीच आलो आहे. हा मला खाईल तर फार बरे होईल'. सिंह त्याच्याजवळ आला व म्हणाला, 'तू मला घाबरत कसा नाहीस ?' ब्राह्मणाने त्याला सर्व हकीकत सांगितली आणि म्हणाला, 'आता मला झटपट मारून खाऊन टाक ?' खरी गोष्ट अशी होती की, तेथील वनदेवतेला त्या गरीब ब्राह्मणाची दया आली

होती. तीच सिंह बनून आली होती. सिंहाने त्याला पाचशे सोन्याच्या मोहरा दिल्या. तो घरी परत आला. सकाळी तो ब्राह्मण जेव्हा डाळ, तांदूळ, पीठ आणायला वाण्याच्या दुकानात गेला, तेव्हा दुकानदाराने विचारले, 'मोहोर कोठे मिळाली ?' ब्राह्मणाने घडलेली खरी गोष्ट सांगितली आणि तो सामान घेऊन घरी परत आला.

दुकानदार लोभी होता. तो रात्री मोहरांच्या लोभाने त्याच जंगलात गेला. त्यानेही देवाचे नाव घेतले. प्रार्थना केली. सिंह आला. दुकानदार म्हणाला, 'तू मला झटपट मारून खाऊन टाक'.

सिंह म्हणाला 'मी तुझ्यासारख्या लोभ्याला नक्कीच खाल्ले असते. पण कोणत्याही निमित्ताने का होईना तू देवाचे नाव घेतलेस, म्हणून मी तुला खाणार नाही. फक्त थोडी शिक्षा करतो'.

सिंहाने त्याला आपल्या पंजाची एक थप्पड लगावली. त्यामुळे त्याच्या एका कानाच्या अगदी चिंधड्या झाल्या आणि एक डोळाही फुटला. त्याला लोभाचे हेच बक्षीस मिळाले.



कोकराची चूक

रात्री पाऊस पडला होता. सकाळी रोजच्यापेक्षा चांगले ऊन पडले होते. बकरीचे पिलू आईचे दूध पोटभर प्याले. मग ते गवताचा वास घेऊन उड्या मारू लागले. ओल्या मऊमऊ जमिनीवर उड्या मारण्यात त्याला मोठी मजा वाटत होती. प्रथम ते आईच्या जवळ खेळत होते. मग कानात वारे भरले तशी दूर जाण्याची त्याला इच्छा झाली.

आई म्हणाली, 'बेटा दूर जाऊ नको. जंगलात फिरताना वाट चुकशील. पिल्लू थोडे दूर गेले होते. तेथूनच ते आईला म्हणाले, 'मी थोड्याच वेळात खेळून परत येईन. तू माझी चिंता करू नकोस. मी रस्ता चुकणार नाही'.

आई मना करीत होती. परंतु ते दूरदूरच जात होते. त्याला आपल्या शहाणपणाचा अभिमान होता आणि आईच्या म्हणण्याचा थोडा रागही आला होता.

ते पिल्लू हुंदडण्यात दंग होते. उड्या मारता मारता त्याला रस्त्याचा विसर पडला. ते थकले. त्याच्या लक्षात आले की, आपण वाट चुकलो आहोत. परतीचा रस्ताच त्याला दिसेना. काट्याकुट्यातून, दाट झाडीतून ते परतीचा रस्ता शोधू लागले.

'छान झालं तू आलास ते ! अरे मला तीन दिवसांपासून काही खायलाच मिळाले नाही'. असे म्हणत जवळच्या झाडीतून एक मोठा लांडगा बाहेर आला.

त्या बकरीच्या पिलाला उत्तर द्यायला किंवा रडायलासुद्धा वेळ मिळाला नाही. त्याला केवळ आपल्या एका मेंढपाळाच्या म्हणण्याची आठवण आली.

मातु पिता गुरु स्वामि सिख सिर धरि करहिं सुभायँ।
लहेउ लाभु तिन्ह जनम कर नतरु जनमु जग जायँ॥

माता, पिता, गुरू, मालक, यांचा उपदेश ऐकून तसे वागावे, म्हणजे त्याला जगात मोठा लाभ होतो'.

★ ★ ★

एकजुटीचे फळ

आपल्या देशात अशी पुष्कळ शहरे व खेडी आहेत की, जेथे फार थोडी झाडे असतात. जर तेथे गाय, बैल इत्यादी पशू कमी असतील, तर तेथे शेण कमी मिळते व स्वयंपाक करण्यास लाकडे किंवा गोवऱ्या मिळण्यास फार अडचण पडते.

एक लहानसा बाजार होता. त्याच्या जवळपास झाडे कमी होती. शेतकऱ्यांची घरे नसल्यामुळे गाय, बैलसुद्धा थोडेच होते. जळणासाठी लाकडे व गोवऱ्या लोकांना तेथे विकत घ्याव्या लागत. एकदा दोन-तीन दिवस सारखा पाऊस पडला. त्यामुळे खेड्यातून एकही मजूर बाजारात सर्पण किंवा गोवऱ्या घेऊन आला नाही. कित्येक घरात सर्पणच नव्हते, त्यामुळे स्वयंपाकच झाला नाही.

त्या गावातील दोन सख्खे भाऊ, आपल्या घरासाठी वाळलेली लाकडे

शोधायला निघाले. त्यांचे वडील घरी नव्हते. त्यांची आई सर्पणाशिवाय स्वयंपाक कशी करणार ? आपल्या मुलांना कशी खाऊ घालणार ? दोन्ही मुले आपल्या वडिलांनी लावलेल्या आंब्याच्या झाडाखाली गेले. त्यांना वादळाने तुटून पडलेली त्या झाडाची एक वाळलेली फांदी खाली पडलेली दिसली.

मोठा मुलगा म्हणाला, 'लाकडे तर मिळाली, पण आपण ती कशी नेणार?'

धाकटा म्हणाला, 'आपण ही सोडून गेलो, तर दुसरा कोणी तरी घेऊन जाईल'.

ते विचारात पडले. 'काय करावं बरं ?' मोठा भाऊ दहा वर्षांचा दर दुसरा लहान साडे-आठ वर्षांचा होता. एवढी मोठी फांदी त्यांच्याकडून उचलली जात नव्हती. जवळच एका मेलेल्या मोठ्या पांढऱ्या किड्याला पुष्कळशा मुंग्या ओढून नेत असलेल्या धाकट्या भावाने पाहिल्या व तो मोठ्याने म्हणाला, 'दादा ! हे काय आहे ?'

मोठा म्हणाला, 'ह्या मुंग्या किड्याला घेऊन जात आहेत'. धाकटा म्हणाला, 'इतका मोठा किडा त्या कशा नेत आहेत ?' मोठा म्हणाला, 'बघ तरी, किती मुंग्या आहेत ! त्या सर्व मिळून त्याला नेत आहेत. पुष्कळ मुंग्या तर मेलेल्या सापालाही ओढत नेतात'.

किडा मोठा होता. तो कधी कधी निसटून पडत असे व त्याच्या अंगाखाली चार-पाच मुंग्या दबल्या जात. पण लगेच इतर मुंग्या किडा बाजूला करून त्या मुंग्यांना बाहेर काढत. अशा प्रकारे मुंग्यांनी न थकता, एकसारखे त्याला ढकलत ढकलत दूरपर्यंत नेले. धाकटा मुलगा ते पाहून आनंदित झाला. त्याने टाळी वाजविली व तो उड्या मारू लागला. त्या वाळलेल्या फांदीवर बसून म्हणाला, 'दादा ! आपण त्या मुंग्यांपेक्षाही नालायक आहोत का ? तू जा आणि मित्रांना बोलावून इकडे घेऊन ये. मी येथे बसतो. मग आपण सर्व मिळून ही फांदी घेऊन जाऊ'.

मोठा मुलगा बाजारात गेला व आपल्या मित्रांना बोलावून घेऊन आला. त्या सर्वांनी मिळून एकदम जोर लावला. काही मुलांनी एका बाजूने ढकलत व काही मुलांनी दुसऱ्या बाजूने ओढत ती फांदी त्या दोघा भावांच्या घरात आणून टाकली.

त्या दोघांच्या आईने आपल्या मुलांबरोबर आलेल्या मुलांना मिठाई दिली आणि म्हटले, 'मुलांनो, एकीमध्ये फार शक्ती असते. तुम्ही सर्व मिळून कठिणात कठीण काम करू शकता. असेच तुम्ही एकीने राहाल, तर तुमची कोणीही हानी करू शकणार नाही. आपसात मिळून मिसळून राहिल्याने तुमचे मनदेखील प्रसन्न आणि निर्भय राहील. तुमची कामे चांगल्या तऱ्हेने सहज पार पडतील.

संगतीचा परिणाम

एकदा बाजारात एक पोपट विकणारा आला. त्याच्याजवळ दोन पिंजरे होते. दोन्हीमध्ये एक एक पोपट होता. त्याने एका पोपटाची किंमत पाचशे रुपये आणि दुसऱ्याची फक्त पाच रुपये सांगितली. तो म्हणे, 'कोणी पाच रुपयेवाला पोपट नेणार असेल तर नेऊ शकेल, पण पाचशे रुपयांचा पोपट घेणाऱ्यास पाच रुपयेवाला पोपट घ्यावाच लागेल'.

तेथील राजा बाजारात आला. पोपटवाल्याचे ओरडणे ऐकून त्याने हत्ती थांबविला व विचारले, 'ह्या दोन पोपटांच्या किंमतीत इतका फरक का ?'

तो म्हणाला, 'हे तर तुम्हांला यांना घरी नेल्यावर आपोआपच कळेल'.

राजाने दोन्ही पोपट घेतले. जेव्हा रात्री तो झोपायला गेला, तेव्हा त्याने सांगितले की, 'पाचशे रुपयेवाल्या पोपटाचा पिंजरा माझ्या पलंगापाशी टांगून ठेवावा'. जसे पहाटेचे चार वाजले, तसे पोपटाने बोलणे सुरू केले, 'राम-राम सीताराम' त्याने खूप सुंदर भजने म्हटली. श्लोक म्हटले. राजा प्रसन्न झाला.

दुसरे दिवशी राजाने दुसऱ्या पोपटाचा पिंजरा जवळ ठेवायला सांगितला. सकाळ होताच त्या पोपटाने वाईट-साईट शिव्या दिल्या. राजाला खूप राग आला. त्याने नोकरास म्हटले, 'ह्या दुष्टाला ठार करा'.

पहिला पोपट जवळच होता. त्याने नम्रतेने विनंती केली. 'महाराज ! याला मारू नका. हा माझा सख्खा भाऊ आहे. आम्ही दोघेही एकाच वेळी जाळ्यात पकडले गेलो होतो. मला एका संताने नेले, तर याला एक कसाई

घेऊन गेला. त्यामुळे मी भजने शिकलो तर हा शिव्या शिकला. यात याचा काही दोष नाही. हा तर वाईट संगतीचा परिणाम आहे. राजाने तो पोपट सोडून दिला. तो उडून गेला.

अस्वलाचे शहाणपण

एकदा एक मनुष्य शिकार करण्यास गेला. बंदूक, काडतुसे त्याच्याजवळ होती. समोर दूरवर उंच पर्वतरांग होती. त्याला लागूनच खोल दरी होती. लहानशी पायवाट पर्वताला लागून दरीजवळून जात होती. पलीकडे जंगली बोरं होती व ती यावेळी चांगली पिकली होती. त्याला माहीत होते की, अस्वले बोरं खाण्यासाठी जात असतात.

एक लहानसे अस्वल इकडून तिकडे पायवाटेवरून जात असलेले त्याने पाहिले. गोळी मारल्यास अस्वल खड्ड्यात पडेल. काही फायदा नाही, असे पाहून तो चूप बसला. दुर्बिण लावताच त्याला दिसले की, तिकडूनही दुसरे एक अस्वल इकडे त्याच पायवाटेवरून येत आहे.

'दोघांच्याही टकरा होतील, भांडण होईल आणि ते खड्ड्यात पडतील'. तो आपल्याशीच बडबडला. पायवाट इतकी अरुंद होती की, तिच्यावरून मागेही फिरता येत नव्हते आणि दोघे एकाच वेळी एकमेकांना ओलांडू शकत नव्हते. तो लक्ष देऊन पाहू लागला.

एकाला गोळी मारली तर दुसरा घाबरेल व तोही पळून जाईल ? अशा विचाराने तो त्यांच्याकडे पहात स्वस्थ उभा राहिला. दुसरं काय करणार ? दोन्ही अस्वले समोरासमोर आली. आपल्या भाषेत त्यांचा काही संवाद झाला. पाच मिनिटात बोलणे आटोपून मोठे अस्वल होते तेथेच खाली बसले. लहान अस्वल त्याच्यावर चढून पुढे निघून गेले आणि मग मोठे अस्वल उभे राहून पुढे चालू लागले.

तो मनात म्हणाला, 'जनावरे इतकी समजदार, शहाणी असतात. पण मूर्ख माणसे आपसात भांडतात'. शिकारी बंदूक न चालविताच घरी परत

आला. त्याने शिकार करणेच सोडून दिले.

'सठ सुधरहिं सत संगति पाई' - 'चांगली संगती मिळाली तर दुष्टसुद्धा सुधारतो'.

करावे तसे भरावे

हुएन सांगची लाऊ हेच त्याचे नाव होते. वडील त्याला सांग म्हणत असत. आपणही वाटल्यास तसेच म्हणा. त्याचे वडील शिकारी होते. अस्वल पकडायचे, हरीण मारायचे आणि त्यांचे कातडे विकायचे. हाच त्यांचा पिढ्यान्‌पिढ्या धंदा होता.

एके दिवशी त्याच्या वडिलांनी त्याला एका झाडाच्या सावलीत बसवून ठेवले आणि स्वत: बंदूक घेऊन जंगलात निघून गेले. घरात आई किंवा भाऊ-बहीण कोणीच नव्हते. रिकाम्या घरात त्याचे मन लागेना. शिक्षकाच्या माराच्या धाकाने तो शाळेतही जात नसे. इतर मुले शाळेत जात. मग तो गावात कोणाशी खेळणार ?

तो वडिलांबरोबर रोज जंगलात जायचा. कधी पक्ष्यांना उडवायचे, कधी राशामागे धावायचे. बोरे आणि करंवदे कधी कधी खायला मिळत. तो शिकाऱ्याचा मुलगा. त्याला जंगलात इकडे तिकडे पळणे आणि खेळण्याची भीती वाटत नसे.

एके दिवशी वडील शिकारीस गेल्यावर तो असाच फिरत होता. एका बाजूने 'खों खों' असा आवाज आला. तो कशाचा आहे हे पाहण्यासाठी तो तिकडे धावला. एक मोठे अस्वल काटेरी झाडीत अडकले होते. त्याच्या मोठमोठ्या केसात काटे गुंतले होते. एक सोडवला की दुसरा गुंतायचा. ते घाबरले होते. मुलाला त्याची दया आली. तो त्याच्याजवळ गेला. काटे एका बाजूस करून त्याने अस्वलाला सोडविले.

अस्वल जोराने ओरडले. त्या मुलासमोर उभे राहून आपल्या बोलीत बडबडले. मुलगा घाबरला. त्याला वाटले, अस्वल आपल्याला खाणार तर

नाही ? त्याला पळूनही जाता येईना. थोड्याच वेळात अस्वल उलट दिशेने पळून गेले. मुलाच्या जिवात जीव आला. अस्वल तर चिडले तर भयंकर शत्रू असते. ते झाडावरही चढू शकते. पण कोणावर खुश झाले तर मित्रही चांगले असते. आपल्यावर उपकार करणाऱ्याचा उपकार ते कधी विसरत नाही. जे दुसऱ्या प्राण्यांवर दया करतात, त्यांना त्या दयेचे व परोपकाराचे फळसुद्धा मिळते. जगातील अनेक प्राणी मनुष्याच्या उपकाराची फेड उपकारांनीच करतात. अस्वलाची भाषा त्या मुलाला समजत नंव्हती. पण ते म्हणत होते, 'मी तुझा मित्र आहे. मी तुझ्यासाठी आत्ता गोड फळे आणून देतो'.

मुलगा दूर जाऊ पाहात होता. तो पळत चालला होता. तितक्यात अस्वल पुन: आले. त्याच्याजवळ खूप छान फळे होती. ती त्याने मुलाच्या हातात दिली. मुलाने ती खाल्ली. फार गोड फळे होती.

मग त्या मुलाची व अस्वलाची मैत्री झाली. ह्या मैत्रीमुळे वडिलांना फार आनंद झाला. अस्वल रोज गोड फळे आणून देऊ लागले. मुलगा आपल्या वडिलांना पण त्यातील काही फळे द्यायचा. एके दिवशी मुलाला जंगलात येताच दिसले की अस्वलाचा डोळा दुखत आहे. ते एका झाडाच्या बुंध्याशी बसून कण्हत होते. मुलाला ते पाहून हसू आले. तो टाळी वाजवून हसू लागला. त्यामुळे अस्वलास खूप राग आला. त्याने त्या मुलाचे नाकच ओरबडून काढले. तुलसी रामायणात म्हटलेच आहे -

जो न मित्र दुख होहिं दुखारी।
तिन्हहि बिलोकत पातक भारी॥

- म्हणजे जो मित्राला दु:ख झाले असता स्वत: दु:खी होत नाही व केवळ त्याच्याकडे पाहात राहतो, त्याला महापाप लागते.

उपकाराची फेड

एका सिंहाची एक गुहा होती. खोल, अंधारी. तिच्यातच एका उंदरीने बीळ केले आणि ती पण तेथेच राहात होती. सिंह जी शिकार आणीत असे,

तिच्या हाडांना चिकटलेल्या मांसावर उंदरीचे छान पोट भरत असे. सिंह जंगलात गेला की ती बिळाबाहेर येई आणि हाडांना लागलेले मांस खाई. त्यामुळे ती खूप लठ्ठ झाली होती.

एके दिवशी सिंह दुपारी झोपला होता. उंदरीला भूक लागली. ती बिळातून बाहेर पडली आणि तिने पोटभर मांस खाल्ले. सिंहाच्या जवळ राहून तिची भीती कमी झाली होती. पोट भरल्यानंतर ती सिंहाच्या अंगावर चढली. त्याचे कोमल नरम शरीर तिला फार आवडले. ती त्याच्या पाय, पाठ, गळा व तोंड यावर इकडून तिकडे धावू लागली.

ह्या गडबडीमुळे सिंह जागा झाला. त्याने तिला पंजात पकडले व तिला रागावत विचारले. 'काय गं ? माझ्या अंगावर काय गडबड करते आहेस ?'

उंदरीची भीतीने वाचाच बंद झाली. कसेतरी थरथर कापत ती म्हणाली, 'महाराज ! माझ्याकडून खरोखरच मोठा गुन्हा झाला. आपण समर्थ आहात. जर क्षमा करून मला सोडून द्याल, तर मी माझ्या शक्तीप्रमाणे आपली सेवा करीन'.

हे ऐकून सिंह हसला. तिला सोडून देत म्हणाला, 'जा, तू काय माझी सेवा करणार ! जंगलच्या राजाला एका लहानशा उंदरीच्या सेवेची काय गरज? पण तुला मी क्षमा करतो'.

योगायोग असा की, एका प्राणिसंग्रहालयास जिवंत सिंहाची आवश्यकता होती. त्या लोकांनी सिंह पकडण्यासाठी जाळे पसरले. त्यात हाच सिंह अडकला. तो मोठ्याने डरकाळ्या फोडू लागला, ओरडू लागला..

तो फार बलवान होता. उसळी मारून पळून जाऊ पाहात होता. दातांनी जाळे तोडू पाहात होता. पण जाळे फार मजबूत होते. सिंह जसजसा उसळ्या मारत होता, पंजे मारत होता, तसतसे जाळे आणखी घट्ट होत होते. त्याने दातांनी जाळे कुरतडल्यामुळे त्याच्या तोंडातून रक्त येऊ लागले. तरीपण जाळे तोडण्याचा त्याचा प्रयत्न चालूच होता व जाळे आणखी घट्ट होत चालले होते. शेवटी तर जाळे इतके घट्ट झाले की सिंहाला हालचाल करणेही अशक्य झाले.

जंगलाचा राजा सिंह जाळ्यात पडल्या पडल्या जोराने डरकाळ्या फोडत होता. त्याला बांधल्यासारखे झाल्यामुळे फार वाईट वाटत होते. पण तो काहीच करू शकत नव्हता. कोणीतरी आपणास पकडणार म्हणून भीतही होता. राग तर त्याला खूप आला होता.

उंदरीने सिंहाचा आवाज ओळखला. ती धावत आली आणि म्हणाली, 'महाराज ! आपण शांत बसा. आपल्या ओरडण्याने दूर गेलेले शिकारी पळत येतील आणि मलाही भीती वाटेल. मी काही काम करू शकणार नाही. मी हे जाळे कुरतडून टाकते.

सिंह चूप बसला. जाळे फार मजबूत होते. उंदरीच्या दातातून रक्त आले तरी पण तिने ते जाळे तोडून टाकले. सिंह काही बोलणार, इतक्यात तीच म्हणाली, 'आता आपण लवकर पळून जा. हे माझे फार मोठे भाग्य आहे की, मला जीवदान देणाऱ्या जंगलाच्या राजाची मी काही सेवा करू शकले'. सिंह एवढेच म्हणाला 'भलो भलाइहि पै लहइ' भल्याकडून भलाईच प्राप्त होते.

★ ★ ★

उपकार

आफ्रिका फार मोठा देश आहे. त्या देशात मोठाली जंगले असून त्यात वाघ, सिंह, लांडगे, कोल्हे इत्यादी भयानक जनावरे खूप आहेत. पुष्कळ लोक सिंहाचे कातडे मिळावे म्हणून त्याला मारतात.

हत्ती पकडण्याची पद्धत पुढीलप्रमाणे आहे.

उन्हाळ्याच्या दिवसात हत्ती ज्या झऱ्यावर पाणी पिण्यास जातात, त्या रस्त्यावर एक फार मोठा खड्डा खोदतात. त्याच्या चारही बाजूंना भाल्यासारखी टोके असलेली लाकडे रोवतात. मग तो खड्डा पातळ लाकडी फळ्यांनी व झाडांच्या पानांनी झाकून टाकतात. हत्ती पाणी प्यायला निघतात तेव्हा त्यांच्या कळपातील पुढचा हत्ती, वर वर पाने असल्यामुळे व खड्डा दिसत नसल्यामुळे जसा त्यावर पाय ठेवतो तसा त्यात पडून जातो. नंतर हत्ती पकडणारे लोक, खड्ड्याच्या एका बाजूला रस्ता करतात व दुसऱ्या पाळीव हत्तींच्या मदतीने त्या खड्ड्यातील हत्तीला पकडतात व बाहेर आणतात.

ते लोक त्या हत्तीला प्रथम काही दिवस उपाशी ठेवतात. खड्ड्यातही हत्तीला काही दिवस उपाशी ठेवले जाते. त्यामुळे तो कमजोर होऊन बाहेर येताना त्रास देत नाही. भुकेने जेव्हा तो तळमळतो तेव्हा एक माणूस त्याला

चारा खाऊ घालतो. अशा प्रकारे तो हत्तीशी ओळख करून घेतो. तोच मग त्याला शिकवितो. शिकविल्यावर हत्तीला विकून टाकतात.

कधी कधी हत्तीसाठी बनविलेल्या खड्ड्यात हरीण, नीलगाय, चित्ता इत्यादी प्राणीही पडतात. ते लोक त्यांनाही पकडतात व घेऊन जातात. एकदा एक सिंह अशाच खड्ड्यात पडला. तो कोणा प्राण्याला पकडण्यास धावला असता चुकून खड्ड्यात पडला.

एक शिकारी तिकडून जात होता. त्याने सिंह खड्ड्यात पडलेला पाहिला. वीर पुरुष कोणाला दु:खात पाहून त्याला मारत नाहीत, त्याला मदत करतात. सिंह खड्ड्यातून वर येण्याचा खूप प्रयत्न करीत होता; पण खड्ड्याच्या बाजूला रोवलेल्या टोकदार काठ्या त्याला टोचत होत्या व पुन: तो खाली पडत होता. शिकाऱ्याने एका दोरीला दोन लाकडे बांधली व तो झाडावर चढला. तिथून दोरी वर ओढून त्याने त्या काठ्या उखडून टाकल्या. झाडावरून त्याने हे काम केले. कारण बाहेर आल्यावर सिंह आपल्यास खाणार तर नाही, अशी त्यास भीती वाटली. दोन लाकडे निघाली व सिंहास बाहेर येण्यास रस्ता मिळाला. एकदम उडी मारून सिंह बाहेर आला.

एके दिवशी शिकारी एका झऱ्याकाठी पाणी पिऊन बंदूक ठेवून बसला होता. थकल्यामुळे त्याने अंग टाकले व त्याला झोप लागली. तितक्यात तेथे एक चित्ता आला. तो चित्ता शिकाऱ्याला मारण्यासाठी त्याच्यावर चढला.

तेवढ्यात एक मोठा सिंह गर्जना करीत आला. त्याची गर्जना ऐकताच चित्ता पळू लागला. पण सिंहाने त्याला गाठले व ठार केले.

शिकाऱ्याला वाटले, सिंहाने चित्त्यास मारले, आता तो मलासुद्धा खाईल. पण सिंह त्याचे समोर आला आणि शेपटी हलवू लागला. शिकाऱ्याने ओळखले की ज्याला त्याने खड्ड्यातून वर काढले, तोच हा सिंह आहे.

सिंहासारखा क्रूर पशूदेखील उपकार करणाऱ्याचा उपकार विसरला नाही. तुम्ही तर मनुष्य आहात. म्हणून कोणी थोडाही उपकार केला, तरी विसरू नये. त्याला मदत करण्यास नेहमी तयार असले पाहिजे.

ढोंगाचा परिणाम

एक कोल्हा होता. एके दिवशी जंगलात त्याला काहीच खायला मिळाले नाही. खूप भूक लागली होती. जवळच्या वस्तीत काही खायला मिळते का, ते बघण्यासाठी तो गावात आला. रात्र अंधारी होती. थंडीचे दिवस असल्यामुळे लोक घराचे दरवाजे बंद करून झोपले होते. तो गल्लोगल्ली भटकत फिरला.

एका बाजूला एक धोब्याचे घर होते. गाढवे बांधलेली होती. एका हौदात कपडे भिजत होते. दुसऱ्या हौदात आणखी काहीतरी होते. त्याला वास आला. वाटले, खाण्याचे काही असेल. हौद उंच होता. त्याने उडी मारली आणि तो त्या हौदात पडला. थंडीचे दिवस व रात्रीची वेळ. थंड पाण्यात पडल्यामुळे त्याचे फारच हाल झाले. त्याने हौदातून बाहेर उडी मारली आणि थरथर कापतच तो जंगलात पळाला.

सकाळी पाणी पिण्यासाठी नाल्यावर गेला. पाण्यात आपले प्रतिबिंब पाहून त्याला आश्चर्य वाटले. रात्री तो नीळ भिजवलेल्या हौदात पडला होता. त्याचा पूर्ण रंगच बदलून तो निळा झाला होता. त्याला आनंद वाटला. त्याने जंगलात जनावरांची सभा बोलावली आणि त्याने जाहीर केले की, 'मी नीलाकर आहे. मला ब्रह्मदेवाने जंगलाचा राजा बनवून पाठविले आहे. माझी आज्ञा न मानणाऱ्यास भयंकर शिक्षा भोगावी लागेल'.

त्या जनावरांनी असे विचित्र रंगाचे जनावर कोठे पाहिले होते ? त्यांनी त्या कोल्हाचे म्हणणे मान्य केले. तो जंगलाचा राजा झाला. सर्वांवर अधिकार गाजवू लागला.

त्याने सिंहाला मंत्री बनविले, चित्त्याला सेनापती. दुसऱ्या जनावरांची सेना बनविली.

तो बसल्या बसल्या सर्वांना आज्ञा देत असे. सिंह त्याच्यासाठी शिकार मारून आणी. अस्वल त्याला बोरे आणि जंगलातील फळे आणत असे. तो स्वत: कोणतेच काम करीत नसे. सर्व पशू नीलाकर महाराज म्हणून त्याला नमस्कार करायचे.

त्या ढोंगी कोल्ह्याला आपल्या जातवाल्यांचा खूप राग येत असे. त्यांना तो जवळसुद्धा येऊ देत नसे. त्याला भीती वाटत असे की, आपणास एखादा कोल्हा ओळखील. त्याने चित्त्याला आज्ञा दिली की, जंगलातून सर्व कोल्हे हाकलून दे. कोल्ह्यांमध्ये ह्या आज्ञेमुळे फारच गडबड माजली. आत्तापर्यंत कोणत्याच राजाने त्यांना वनातून हाकलून दिले नव्हते. ते सगळे एकत्र मिळून राजाला कसे समजवावे, याचा विचार करू लागले. घर सोडून जाणार तरी कुठे ? काही उपाय सापडत नव्हता.

एके दिवशी एका चकण्या कोल्ह्याने आपल्या जातवाल्यांना म्हटले, 'हा नवा राजा विचित्र आहे. त्याचे दात किंवा पंजे मजबूत नाहीत. हा बलवानही दिसत नाही. सिंह तर दुसऱ्याने मारलेल्या शिकारीला स्पर्शसुद्धा करत नाही आणि हा तर नेहमी दुसऱ्याकडून शिकार मागवितो'. दुसरा म्हणाला, 'मलासुद्धा काही तरी घोटाळा दिसतो. हा तर दिसायला आपल्यासारखाच दिसतो. फक्त रंग निराळा आहे'.

चकणा म्हणाला, 'बरे, आपण सर्व मिळून त्याच्याजवळ मागे जाऊन कुई कुई तर करू. आत्ता खरी गोष्ट कळेल'.

सगळ्यांना तो सल्ला पटला. नकली कोल्हा जनावरांच्या दरबारात बसला होता. मागच्या बाजूने कोल्ह्यांचे ओरडणे जोरात चालू झाले. त्याला आपल्या राजेपणाचा विसर पडला. त्याने कान उभे केले. आकाशाकडे तोंड केले. शेपटी आपटली आणि इतर कोल्ह्यांप्रमाणे तो ओरडू लागला. ते ऐकताच सर्व जनावरे म्हणाली, 'अरे, हा तर कोल्हा !' त्याच्यावर सगळी जनावरे तुटून पडली. तो पळून जाण्याच्या आत सर्वांनी त्याचे तुकडे तुकडे केले.

'उघरहिं अंत न होइ निबाहू' ढोंग शेवटी उघडे पडते.



बाबाजी गेले चोरी करायला

एके दिवशी एक बाबाजी आपल्या आश्रमातून गंगेवर स्नानासाठी गेले. त्यादिवशी चुकून ते अर्ध्या रात्रीच निघाले. रस्त्यात काही चोर भेटले. चोर

बाबाजीस म्हणाले, 'आमच्या बरोबर चला. नाहीतर मारून टाकू'.

बिचारे बाबाजी काय करणार ? त्यांच्या बरोबर निघाले. चोरांनी एका चांगल्या घरी भिंतीला भोक पाडले. एक चोर बाहेर राहिला. इतर आत गेले. साधू बाबालाही आत नेले. चोर पेट्या, तिजोरी शोधू लागले. एका सिंहासनावर भगवंताची मूर्ती विराजमान झालेली बाबाजींना दिसली. त्यांनी विचार केला, 'आलोच आहो तर आपणही काही करावे'. ते देवाची पूजा करावयास बसले. चंदन उगाळले, उदबत्ती लावली आणि नैवेद्य दाखविण्यासाठी काही मिळते का, ते शोधू लागले. तेथे प्रसादाला काही नव्हते. बाबाजींना वाटले, आपण देवाला उठवले तर त्याची सेवा करायला एखादा दास किंवा दासी तत्परतेने येईल. मग आपण त्याच्याकडून प्रसाद मागून घेऊ. देव रेशमी चादर पांघरून झोपले होते. पूजेसाठी त्यांना उठविणे आवश्यक होते. बाबाजींनी शंख उचलला आणि जोराने वाजविला.

भगवंत उठले की नाही माहीत नाही. परंतु घरातील सर्व लोक खडबडून जागे झाले. चोर तर ताबडतोब पळून गेले. घरातील लोकांनी बाबाजींनाच पकडले. बाबाजी म्हणाले, 'ओरडू नका. देवाला नैवेद्य दाखविण्यासाठी काही लौकर आणा. तोपर्यंत मी पूजा करतो. पूजा झाल्यावर तुम्हा सर्वांना प्रसाद देईन. त्या चोरांनाही देईन, ते तुमच्या भिंतीला भोक पाडून घरात आले आहेत. जा, लवकर जा'. घरातील लोकांना फार आश्चर्य वाटले. विचारल्यावर सर्व हकीकत समजली. तेव्हा एका स्त्रीने हसत हसत बाबाजींना देवाच्या नैवेद्यासाठी पुष्कळसे पेढे दिले. त्यावेळी एक म्हातारे बुवा असे गात होते.

बिधि बस सुजन कुसंगत परहीं।
फनि मनि सम निज गुन अनुसरहीं॥

'दैवयोगाने सज्जन माणूस दुष्टांच्या संगतीत आला तरी सापाच्या डोक्यावरील मण्याप्रमाणे आपल्या गुणांनुसारच वागतो'.

मला माणूस पाहिजे

आसाममध्ये एक मंदिर होते. मंदिर खूप मोठे होते. हजारो प्रवासी, यात्रेकरू दर्शनास येत असत. एकाएकी त्या मंदिराचा मुख्य पुजारी मरण पावला. मंदिराच्या महंताला नवीन पुजाऱ्याची जरुरी निर्माण झाली. त्यांनी घोषणा केली की, 'उद्या सकाळी पहिल्या प्रहरी येऊन पूजेसंबंधीच्या परीक्षेत जो योग्य ठरेल, त्याला पुजारी म्हणून नेमले जाईल'.

मंदिर मोठे असल्यामुळे पुजाऱ्याला उत्पन्न बरेच होते. पुष्कळ ब्राह्मण सकाळी पोहोचण्यासाठी लवकर निघाले. मंदिर टेकडीवर होते. एकच रस्ता होता. त्याच्यावरही काटे-कुटे, दगड-धोंडे होते. ब्राह्मणांची गर्दी मंदिराकडे जात होती. काटे आणि दगड टाळत लोक कसेतरी चालले होते.

सर्व ब्राह्मण पोहोचले. महंताने सर्वांना आदराने बसविले. सर्वांना देवाचा प्रसाद मिळाला. सर्वांना वेगवेगळे प्रश्न आणि मंत्र विचारले गेले. शेवटी परीक्षा पूर्ण झाली. दुपार झाली आणि सर्व लोक उठायला लागले, तेव्हा एक तरुण ब्राह्मण तेथे आला. त्याचे कपडे फाटके होते. तो घामाने चिंब झाला होता. गरीब वाटत होता.

महंत म्हणाले, 'तुम्ही फार उशीर केला'.

ब्राह्मण म्हणाला, 'मला माहीत आहे. मी फक्त देवाचे दर्शन घेऊन परत जाईन'.

त्याची दशा पाहून महंताला दया आली. म्हणाले, 'तुम्ही लवकर का आला नाहीत ?'

त्याने उत्तर दिले, 'घरून लवकर निघालो. रस्त्यात बरेच काटे आणि दगड-धोंडे होते. यात्रेकरूंना चालण्यास त्रास होत असे. ते सर्व साफ करण्यात उशीर झाला'.

महंताने विचारले, 'बरे, तुम्हाला पूजा येते का ?'

ब्राह्मण म्हणाला, 'देवाला स्नान घालणे, चंदन लावणे, फुले वाहणे, धूप-दीप दाखविणे, नैवेद्य दाखविणे आणि पडदा पाडणे, शंख वाजविणे

इतके मला येते'.

महंत म्हणाला, 'आणि मंत्र ?'

तो उदास होऊन म्हणाला, 'देवाला आंघोळ घालण्यास, खाऊ घालण्यास मंत्रसुद्धा असतात, हे मला माहीत नाही'.

सर्व पंडित हसू लागले. 'हा मूर्खसुद्धा पुजारी बनण्यास आला आहे'.

महंताने एक क्षण विचार केला आणि म्हणाला, 'पुजारी तर तुम्ही बनलात. आता मंत्र शिकून घ्या. मी शिकवीन. मला देवाने स्वप्नात सांगितले की, मला माणूस पाहिजे'.

'आम्ही लोक माणसे नाही का ?' दुसऱ्या पंडिताने विचारले. ते लोक महंतावर नाराज झाले होते. इतके शिकले सवरलेले ब्राह्मण असताना हा महंत या मंत्रही न येणाऱ्यास पुजारी नेमतो, ही गोष्ट त्यांना अपमानकारक वाटत होती.

महंताने पंडितांकडे पाहिले आणि तो म्हणाला, 'आपला स्वार्थ तर पशूंनाही समजतो. पुष्कळशी जनावरे फार चतुर असतात. पण खरा माणूस तोच की जो दुसऱ्यांना सुख देण्याकडे लक्ष ठेवतो. दुसऱ्यांना सुख देण्यासाठी आपला स्वार्थ आणि सुख देखील सोडून देतो'.

पंडित लोकांनी हे ऐकून खाली मान घातली. त्यांना फार लाज वाटली. ते हळूहळू उठले. देवाला व महंताला नमस्कार करून टेकडी उतरू लागले.

बंधूंनो ! तुम्ही विचार करा तुम्ही माणूस आहात की नाही ?

कासव गुरू

एक म्हातारा माणूस होता. तो गंगेच्या काठी राहात असे. त्याने एक झोपडी बांधली होती. झोपडीत एक पलंग होता, माठ होता. त्याने एक कासव पाळले होते. तो दुपारी जवळच्या वस्तीत अन्न मागण्यास जात असे. त्याचबरोबर थोडे चणे मागायचा. ते भिजवून कासवास खाऊ घालायचा.

कोणी तरी विचारले, 'तुम्ही हा काय घाणेरडा प्राणी पाळला आहे ? फेकून द्या त्याला गंगेत'.

म्हाताऱ्याला राग आला. तो म्हणाला, 'तुम्ही माझ्या गुरूचा अपमान करीत आहात'. तुम्हांला दिसत नाही का ? थोडासाही आवाज येताच किंवा कोणाचा थोडासाही स्पर्श होताच आपले अवयव कसे आत ओढून घेतो. त्याला कितीही हलवा-डोलवा, ते एक पायदेखील हलवीत नाही'.

'त्यामुळे काय झाले ?' त्याने विचारले.

'का नाही झाले ? मनुष्याने ही असेच सावध राहिले पाहिजे. लोभ, लालूच सोडून व गर्दीत डोळे बंद करून राम-राम केले पाहिजे'.

खरी गोष्ट अशी की, तो म्हातारा कोणालाही पाहताच झोपडीत पळून जात असे व जोरजोराने राम राम म्हणत असे. बोलावले तरी ओ देत नसे. आज कसा काय बोलला कोणास ठाऊक ?

तो माणूस म्हणाला, 'कसे ही असो. पण हा फार किळसवाणा दिसतो'.

म्हातारा म्हणाला, 'म्हणून काय झाले ? आपल्याला जर फायदा होत असेल तर नीचावरही प्रेम केले पाहिजे'.

तो कासवाला हातावर घेऊन, त्याच्यावरून दुसरा हात फिरवीत गाऊ लागला -

'अति नीचहु सन प्रीती करिअ जानि निज परम हित'

आपल्या भल्यासाठी अतिशय नीचावर ही प्रेम करावे.

बगळा उडाला

जपान देशात एक गुराखी राहात असे. त्याचे नाव होते मुसाई. एके दिवशी गायी चरत असता एक बगळा उडत उडत आला व त्याच्या पायाजवळ पडला. त्याने त्याला उचलले. बहुतेक ससाण्याने बगळ्याला जखमी केले

असावे. त्याच्या पांढऱ्या स्वच्छ पंखावर रक्ताचे लाल थेंब होते. बगळा बिचारा वारंवार तोंड वासत होता.

मुसाईने प्रेमाने त्याला गोंजारले. पाण्याने त्याचे पंख धुतले. थोडे पाणी चोचीत टाकले. पक्ष्याला तरतरी आली. थोड्याच वेळात तो उडून गेला. काही दिवसांनी एका सुंदर व श्रीमंत मुलीने मुसाईच्या आईस विनंती केली आणि त्याचे लग्न त्या मुलीशी झाले.

मुसाई फार खूष झाला. त्याची बायको फार चांगली होती. ती मुसाईची व त्याच्या आईची मनापासून सेवा करीत असे. स्वत:च घरची सर्व कामे करी. तिची सासू गावभर सुनेचे कौतुक करत फिरायची. तिला घरचे काहीच काम करावे लागत नसे.

दुर्दैवाने एकदा दुष्काळ पडला. शेतात काही पिकले नाही. मुसाई आपल्या आई आणि बायकोसह मजुरीसाठी टोकियो शहरात आला. मजुरी काय लवकर मिळते ? त्याच्या जवळचे सर्व पैसे संपले. उपवास करावा लागला. तेव्हा त्याची बायको म्हणाली, 'मी मलमल बनवून देईन. तुम्ही ती विकत जा. पण जेव्हा मी मलमल विणत असेन, तेव्हा माझ्या खोलीत कोणी येऊ नये'.

मुसाईला काही समजेना. तो बुचकळ्यात पडला की, आपली बायको मलमल कशी काय बनवणार ? पण तो साधा होता. तिच्यावर त्याचा पूर्ण विश्वास होता. ती यापूर्वी कधी खोटे बोलली नव्हती. पैसेही जवळ नव्हते. कसेही करून पैसा मिळाला तर घर चालणार होते.

त्याने तिचे म्हणणे ऐकले. ती जर काही मागतच नव्हती, तर तिचे म्हणणे ऐकण्यात काय तोटा होता ? त्याने आईला बजावून सांगितले की, आपली बायको जेव्हा आपली खोली बंद करील तेव्हा तिला बोलवायचे नाही व खोलीतही जायचे नाही.

मुसाईच्या बायकोने बनवलेली मलमल अगदी अद्वितीय अशी होती. दुधासारखी पांढरी शुभ्र आणि त्यावर लाल रंगाचे बारीक बारीक ठिपके. अतिशय नाजूक. ती रेशमासारखी चमकत होती. मुसाई ती विकायला गेला तर खुद्द मिकाडो राजाने ती घेतली. सोन्याच्या मोहरा मुसाईला मिळाल्या.

आता तर तो श्रीमंत झाला. ती मलमल बनवायची आणि हा विकायचा.

एके दिवशी त्याने विचार केला. 'माझी बायको मलमल विणताना कापूस घेत नाही, रंग घेत नाही, मग ती मलमल कशी काय बनवते ?'

एक दिवस मुसाईच्या बायकोने मलमल बनविण्यासाठी खोली बंद करून घेतली. मुसाई लपत लपत खिडकीतून चोरून पाहू लागला. त्याने पाहिले, खोलीत बायकोच नव्हती. तिथे एक पांढरा शुभ्र बगळा बसला होता. तो आपल्या पंखातून तार काढत होता व पंजाने मलमल विणत होता. त्याच्या गळ्याला एक जखम होती व तेथून येणाऱ्या रक्ताचे ठिपके तो मलमलीवर देत होता. तोच बगळा स्त्री बनला असून आपण केलेल्या उपकाराची फेड करीत आहे, हे त्याच्या लक्षात आले.

हे पाहून मुसाईला खूप नवल वाटले. एका लहानशा बगळ्याने उपकाराची अशी फेड केली. त्याचे हृदय भरून आले व डोळ्यात पाणी आले. तो जेथल्या तेथेच थांबला. पत्नीने सांगितलेली गोष्ट तो विसरला. त्याला हेही आठवत नव्हते की, तो तेथे कशासाठी उभा आहे.

त्याचवेळी त्याच्या आईने त्याला हाक मारली. मुसाई बोलला. बगळा त्याचा आवाज ऐकून दचकला आणि मग खिडकीतून उडून गेला.

जो प्राण्यांवर दया करतो, त्याला मोठा लाभ होतोच.



खरे बोला

एक डाकू होता. तो डाके घालायचा, लोकांना मारायचा, त्यांचे जे पैसे, भांडी, कपडे, दागिने, असतील ते घेऊन पळून जायचा. त्याने किती लोकांना मारले, किती पाप केले, त्याची गणतीच नाही.

एकदा एके ठिकाणी प्रवचन चालू होते. साधू कथा सांगत होते. मोठ-मोठे लोक आले होते. डाकूही ऐकायला आला. त्याने विचार केला, 'कथा संपल्यावर रात्र होईल. कथा ऐकून जी श्रीमंत माणसे घरी परत जातील, त्यांच्यापैकी एखाद्याला संधी साधून लुटता येईल.'

कोणी कसाही असो, तो ज्या जमावात जातो, त्याचा त्याच्या मनावर प्रभाव पडल्याशिवाय राहात नाही. देवाची कथा व सत्संगात थोडा वेळ बसल्याने किंवा कोणत्याही निमित्ताने गेल्यास फायदाच होतो.

डाकूला वाटले, साधू तर खूप छान कथा सांगतात. ती ऐकून त्याला मृत्यूची भीती वाटली. मेल्यावर पापाची शिक्षा मिळेल, हे ऐकून तो घाबरला. साधूजवळ जाऊन म्हणाला, 'महाराज ! मी डाकू आहे. डाका टाकल्याशिवाय तर माझे चालणार नाही. माझ्याही उद्धाराचा काही उपाय आहे का ?'

साधूने विचार करून म्हटले, 'तू खोटे बोलणे सोडून दे'.

डाकूने मान्य केले. तो परत गेला. कथेला आलेले सर्व लोक घरी परत गेले होते. त्याने राजाच्या घरी डाका टाकण्याचा निश्चय केला. तो राजवाड्याजवळ आला.

पहारेकऱ्याने विचारले, 'कोण आहे ?'

डाकूने खोटे बोलणे सोडलेच होते. तो म्हणाला, 'डाकू'.

पहारेकऱ्याने विचार केला, 'राजवाड्यातीलच कोणी तरी आहे. मी विचारल्यामुळे नाराज झाला असेल'. त्याने डाकूला आत सोडले, म्हणाला, 'मी सहज विचारले. तुम्ही नाराज का होता ?'

तो आत गेला. खूप मोठी पेटी डोक्यावर घेऊन निघाला. पहारेकऱ्याने विचारले, 'काय घेऊन चाललात ?'

तो उत्तरला, 'दागिन्यांची पेटी'.

पहारेकऱ्याने पुन: विचारले, 'कोणाला विचारून नेता आहात ?' खरे बोलण्याचा प्रभाव त्याने पाहिलाच होता. आपल्याला राजवाड्यात जो प्रवेश मिळाला तो सत्याच्या प्रभावामुळेच हे त्याला समजलेच होते. नाहीतर पहारेकरी कशाला जाऊ देता ? डाकूच्या मनात त्या साधूविषयी फार श्रद्धा निर्माण झाली होती. त्याची भीतीच निघून गेली होती. त्याला वाटले, इतके दागदागिने घेऊन मला न पकडता मी बाहेर जाऊं शकलो तर ह्यापुढे मला आयुष्यात डाका घालायची जरुरीच पडणार नाही. त्याला आता आपले डाके घालायचे काम नकोसे वाटू लागले. खरे बोलण्यावर त्याचा विश्वास बसला होता.

त्यामुळे पहारेकऱ्यास न भिता त्याने बेधडक खरे उत्तर दिले - 'डाका टाकून तेत आहे'.

काही साधारण वस्तू असावी आणि हा माणूस फार चिडखोर दिसतो. असे वाटून त्या पहारेकऱ्याने त्याला जाऊ दिले. सकाळी राजवाड्यात हलकल्लोळ झाला. दागिन्यांची पेटीच नव्हती. पहारेकऱ्याकडून माहिती मिळाल्यावर राजाने त्या डाकूला शोधून बोलवून आणले. त्याच्या खरे बोलण्यामुळे राजा प्रसन्न झाला. त्याने त्याला आपल्या महालाचा मुख्य रक्षक म्हणून नेमले. आता त्याला डाके घालण्याची गरजच राहिली नव्हती. सर्वात मोठे पाप म्हणजे खोटे बोलणे. ते त्याने सोडले. त्यामुळे इतर पापे आपोआप सुटली.

- 'नहिं असत्य सम पातक पुंजा' 'खोटे बोलण्यासारखे दुसरे पाप नाही'.

सर्वांत मोठा धर्मात्मा

एका राजाला चार मुले होती. राजाने त्यांना बोलाविले आणि म्हटले की, 'जो सर्वांत मोठ्या धर्मात्म्यास शोधून आणील तोच राज्याधिकारी होईल'. चारही मुले घोड्यावर बसून धर्मात्म्याच्या शोधासाठी निरनिराळ्या दिशेने गेली.

एके दिवशी मोठा मुलगा परत आला. त्याच्या बरोबर एक शेटजी होते. मुलगा वडिलांना म्हणाला, 'हे शेटजी नेहमी हजारो रुपयांचे दान करतात. यांनी अनेक मंदिरे बनविली आहेत. तलाव खोदविले आहेत. अनेक ठिकाणी यांच्या पाणपोया चालतात. तीर्थांचे ठिकाणी यांची सदावर्ते आहेत. नेहमी कथा-कीर्तन ऐकतात, साधू-ब्राह्मणांना आधी भोजने देतात व मग स्वत: जेवतात. गायीची पूजा करतात. त्यांच्यापेक्षा मोठा धर्मात्मा जगात कोणी नाही'.

राजा म्हणाला, 'हे निश्चितच धर्मात्मा आहेत'. शेठजींचा आदर-सत्कार झाला. ते निघून गेले.

दुसरा मुलगा एका कृश ब्राह्मणास घेऊन आला. राजाच्या समोर त्याला

उभे केले व म्हणाला, 'ह्या ब्राह्मणाने चारही धाम आणि सात पुऱ्या यांची पायी यात्रा केली आहे. हे नेहमी चांद्रायण व्रत करीत असतात. असत्याला फार भितात. कधी कोणी यांना राग आलेला पाहिला नाही. नित्य नेमाने मंत्रजप करतात. त्याशिवाय पाणीही पीत नाहीत. त्रिकाल स्नान, संध्या करतात. ह्यावेळी सर्व जगात हेच मोठे धर्मात्मा आहेत'.

राजाने ब्राह्मणास नमस्कार केला. त्याला पुष्कळ दक्षिणा दिली आणि म्हटले, 'हे फार चांगले धर्मात्मा आहेत'.

तिसरा मुलगा पण आला. त्याने एका बाबाजीला बरोबर आणले होते. बाबाजीने आल्याबरोबर आसन लावले आणि डोळे बंद केले. त्यांच्या मोठ्या जटा होत्या व शरीराची फक्त हाडे राहिली होती. मुलगा म्हणाला, 'महाराज ! मी यांची खूप विनवणी केली, तेव्हा कुठे ते यायला तयार झाले. हे फार मोठे तपस्वी आहेत. सात दिवसांनी फक्त एकदा दूध घेतात. उन्हाळ्यात पंचाग्निसाधन करतात. हिवाळ्यात पाण्यात उभे राहतात. सदा देवाचे ध्यान करतात. यांच्यासारखा धर्मात्मा मिळणे कठीण आहे'.

राजाने महात्म्याला साष्टांग नमस्कार घातला. त्यांनी राजाला काही आशीर्वाद दिला आणि काही न बोलता निघून गेले. राजा म्हणाला, 'हे खरोखर मोठे धर्मात्मा आहेत'.

शेवटी धाकटा मुलगा मळकट कपडे घातलेल्या एका खेडूत शेतकऱ्यास घेऊन उपस्थित झाला. शेतकरी दुरूनच हात जोडत, भीत भीत राजासमोर आला. तिन्ही मुले त्याला पाहून आपल्या धाकट्या भावाच्या मूर्खपणाला हसू लागले. धाकटा भाऊ म्हणाला, 'एका कुत्र्याच्या शरीरावर जखमा झाल्या होत्या. कोणाचा कुत्रा होता हेही माहीत नव्हते. तरीपण ह्याने त्या पाहिल्या आणि लागला त्या जखमा धुवायला. मी याला आणले आहे. मला माहीत नाही, हा धर्मात्मा आहे की नाही ? आपणच विचारा'.

राजाने विचारले, 'तुम्ही काय धर्म करता ?'

भ्यालेल्या शेतकऱ्याने म्हटले, 'मी शिकलेला नाही. मी धर्म काय जाणणार ? कोणी आजारी पडला तर मी त्याची सेवा करतो. कोणी मागतो, त्याला मूठभर अन्न देतो.

राजा म्हणाला, 'हा सर्वांत मोठा धर्मात्मा आहे'. सर्व मुले इकडे तिकडे पाहू लागली. तेव्हा राजा म्हणाला, 'दान, पुण्य करणे, देवपूजा, गोपूजा करणे धर्मच आहे. खोटे न बोलणे, क्रोध न करणे, तीर्थ यात्रा करणे, संध्या पूजा करणे हा सुद्धा धर्म आहे. तप करणे तर धर्म आहेच. पण सर्वांत मोठा धर्म आहे - स्वार्थ न ठेवता भुकेल्यास अन्न देणे, असहाय प्राण्यांची सेवा करणे, रोग्याची सेवा करणे, दु:खितास मदत करणे. जो दुसऱ्या प्राण्यांचे कल्याण करतो, त्याचे कल्याण आपोआप होते. तिन्ही लोकांचे स्वामी भगवान त्याच्यावर प्रसन्न होतात'.

'परहित सरिस धरम नहिं भाई' दुसऱ्याचे हित करण्यासारखा दुसरा धर्म नाही.

नरकाची यात्रा

'हा तर फार भयानक नरक आहे'. महाराज युधिष्ठिराला यमाचे दूत नरक दाखवीत होते. महाराज युधिष्ठिराने केवळ एकदाच अर्धे खोटे भाषण केले होते की, 'अश्वत्थामा मेला, मनुष्य की हत्ती माहीत नाही ?' सत्य अशाप्रकारे गोलमाल करून बोलण्यामुळे त्यांना नरक पाहण्याचीच शिक्षा झाली होती.

त्यांनी नरक पाहिले. कुठे कोणाला साप विंचू चावत होते, कोणाचे जिवंतपणीच कुत्रे, कोल्हे, गिधाडे लचके तोडत होते. कोणी करवतीने चिरला जात होता. तर कोणी तेलात तळला जात होता. अशाप्रकारे पाप्यांना अतिकडक शिक्षा दिली जात होती.

युधिष्ठिर यमदूतास म्हणाले, 'ही फार भयंकर शिक्षा आहे. कोणाला येथे शिक्षा होते ?'

यमदूत नम्रतेन म्हणाले, 'होय महाराज, ह्या फार भयंकर शिक्षा आहेत. जे प्राण्यांना त्रास देतात, मांस खातात, दुसऱ्याचे हक्क हिसकावून घेतात, ह्यासारखी मोठी पापे करतात, त्यांना येथे शिक्षा होते.

लोक ओरडत होते. पण युधिष्ठिर तेथे थांबले, त्यामुळे त्यांच्या यातना

नष्ट झाल्या. ते म्हणू लागले, 'आपण येथेच राहा'. युधिष्ठिर तेथेच थांबले. तेव्हा स्वत: यमदेव आणि इंद्र आले. त्यांनी म्हटले, 'धर्मराज युधिष्ठिर ! आपण एकदा अर्धसत्य बोललात म्हणून आपणास ह्या रस्त्याने आणले. आपले कोणीही ओळखीचे नातेवाईक येथे नाहीत. जे मनुष्यशरीर धारण करून पापे करतात, जीवांवर दया करीत नाहीत, उलट पीडा देतात, तेच येथे येतात'.

धर्मराज युधिष्ठिरांनी काही विचार केला. ते असा विचार करीत असावेत -

नर सरीर धरि जे पर पीरा।
करहिं ते सहहिं महा भव भीरा॥

मनुष्यशरीर धारण करून जे दुसऱ्यास दु:ख होतात, त्यांना भयंकर दु:ख भोगावे लागते.

डॉक्टरसाहेब मार खातात

खूप मोठ्या शहरात राहणारे एक डॉक्टरसाहेब आहेत. त्यांच्याकडे रोग्यांची खूप गर्दी असते. घरी बोलावले तर पुष्कळ रुपये फी द्यावी लागते. ते खूप प्रसिद्ध आहेत. त्यांच्या औषधाने रोगी लवकर बरे होतात.

ते यासाठी प्रसिद्ध होते की कोणी गरीब त्यांना घरी बोलावण्यास आला तर ते आपल्या टांग्यात बसून त्यांच्या घरी जातात. काही पैसे न घेता औषध देतात. गरज असेल तर रोग्याला दुधासाठी स्वत:चे पैसेही देतात.

डॉक्टरांनी आपले वडील जिवंत असतानाची गोष्ट सांगितली. ते म्हणाले, 'त्यावेळी माझे वडील जिवंत होते. डॉक्टरीचा धंदा नवीनच सुरू केला होता, तरी चांगला चालला होता. एके दिवशी दूरच्या गावाहून एक शेतकरी आला. त्याने विनंती केली, 'माझी बायको फार आजारी आहे. डॉक्टरसाहेब, जरा तिला तपासायला या'.

डॉक्टर म्हणाले, 'वीस रुपये दिल्याशिवाय मी इतक्या दूर येऊ शकत नाही. माझी फी येथेच द्या आणि टांगा आणा तर मी येईन.

शेतकरी फार गरीब होता. त्याने डॉक्टरांच्या पायावर पाच रुपये ठेवले. तो रडू लागला व म्हणाला, 'माझ्याजवळ अधिक पैसे नाहीत. मी टांगा आणतो. बाकीचे पंधरा रुपये मी पीक आल्यावर जरूर देईन'.

डॉक्टर त्याच्यावर रागावले. त्याने दिलेले पैसे त्यांनी फेकून दिले व म्हणाले, 'मी तुमच्यासारख्या भीक मागणाऱ्यांसाठी डॉक्टरकी शिकलो नाही. माझ्याकडून इलाज करून घेणाऱ्याने प्रथम पैशांची व्यवस्था करून आले पाहिजे. तुमच्यासारख्यांशी बोलायला मला वेळ नाही'.

पुनः तो रडत रडत म्हणाला, 'सरकार, मी गावात कोणाकडून कर्ज काढून आपणास पैसे देईन, पण लवकर चला. माझी बायको मरून जाईल, मुले उघडी पडतील, माझे घर उद्ध्वस्त होईल'.

डॉक्टर आणखी चिडून म्हणाले, 'खड्ड्यात गेले तुझे घर आणि मुले. प्रथम पैसे आण, मग चलायची गोष्ट कर'.

डॉक्टरांचे वडील वरून सर्व ऐकत होते. त्यांनी डॉक्टरांना बोलावले. ते जसे जवळ आले तसे वडिलांनी त्यांना एक थप्पड मारली. इतक्या जोरात मारली की, डॉक्टर चक्कर येऊन खाली पडले.

वडील म्हणाले, 'मी तुला यासाठी डॉक्टर केले नाही की, तू गरिबांशी असा वाईट व्यवहार करावा, त्यांना शिव्या द्याव्यात, त्यांचा गळा दाबावा. जा, आत्ताच्या आत्ता माझ्या घरून निघ. तुझ्या पालन-पोषणास व शिक्षणास जितके पैसे लागले असतील तितके मुकाट्याने देऊन टाक. नाही तर आत्ताच्या आत्ता त्या गरिबाच्या घरी आपल्या टांग्यात बसून जा. त्याच्याजवळून एक पैसा जरी तू घेतलास तर तुझ्या दवाखान्यावर रॉकेल ओतून पेटवून देईन'. डॉक्टरांनी हात जोडले. तेव्हा थोडे शांत होऊन वडील म्हणाले, 'तुझ्या अशा व्यवहारामुळे मला लाज वाटते. जर माझी सून आजारी असती, तुझ्याजवळ पैसे नसते, तू एखाद्या डॉक्टरकडे गेला असतास, हात जोडून त्यांना प्रार्थना केली असतीस आणि तू जे आता शेतकऱ्यास बोललास तसे ते डॉक्टर बोलले असते तर तुझ्या मनाला किती दुःख झाले असते ? मनुष्याने दुसऱ्याशी असाच व्यवहार करावा, जो दुसऱ्याने आपल्याशी करावा असे आपणास वाटते. असे करशील तर तुला गरिबांचा आशीर्वाद मिळेल व तुझी भरभराट होईल'.

डॉक्टरांचा एक गाल थपडेमुळे सुजला होता. त्यांनी वडिलांचे म्हणणे मान्य केले आणि काही न बोलता औषधाची पेटी घेऊन त्या शेतकऱ्याला टांग्यात बसविले व निघाले. ते म्हणतात की, कोणी गरीब रोगी आला की मला वडिलांच्या त्या मूर्तीची आठवण होते व गालावर एकदम हात जातो. त्याचबरोबर त्यांचा उपदेश आठवतो. माझे वडील धन्य होते.

मनुष्य की जनावर !

एक घडलेली गोष्ट आहे. नाव सांगणार नाही. बरीच मुले शाळेत निघाली. दुपारची सुट्टी होती. सगळी मुले हसत खेळत जात होती. शाळेच्या फाटकासमोर सडकेवर एक मनुष्य जमिनीवर पडलेला होता. कोणी त्याच्याकडे लक्ष दिले नाही. सगळे आपापल्या तंद्रीत चालले होते.

एका लहान मुलाने त्याला पाहिले. तो त्याचे जवळ गेला. तो आजारी होता. मुलाला त्याने पाणी मागितले. मुलाने जवळच्या घरून पाणी आणले. तो प्याला. पुनः झोपला, मुलाने जवळच्या घरी पाण्याचे भांडे नेऊन दिले आणि तो खेळायला निघून गेला.

संध्याकाळी मुलगा घरी आला. त्याच्या वडिलांना कोणीतरी सांगितले की, 'शाळेसमोर दुपारनंतर कोणीतरी मनुष्य मेला'. ते त्याने ऐकले व तो वडिलांना म्हणाला, 'बाबा ! तो तर सडकेवर पडला होता. मीच त्याला पाणी पाजले होते. वडील फार नाराज झाले, ते मुलास म्हणाले, 'तू माझ्या डोळ्यांसमोरून चालता हो, एका आजाऱ्यास पाहून त्याला दवाखान्यात न नेता सोडून दिलेस, तू मनुष्य नाहीस, जनावर आहेस'. भीत भीत मुलगा म्हणाला, 'मी एकटा होतो. मी त्याला कसा काय दवाखान्यात नेऊ शकलो असतो ?'

वडील म्हणाले, 'निमित्त सांगू नकोस, तू नेऊ शकत नव्हतास तर शिक्षकांना सांगायचे होतेस किंवा घरी येऊन मला सांगायचे होतेस. मी काही व्यवस्था केली असती'. तुम्ही विचार करा की, तुम्ही काय करता ? एखाद्या रोग्याला, जखमी माणसाला, दुःखिताला पाहून शक्तीप्रमाणे मदत करता की निघून जाता ? तुम्हांला कळेल की तुम्ही कोण आहात - 'मनुष्य की जनावर ?'

समाधानाचे फळ

विलायतेत एकदा दुष्काळ पडला होता. लोक उपाशी मरू लागले. एका लहान शहरात एक श्रीमंत दयाळू पुरुष होते. त्यांनी सर्व लहान मुलांना दररोज एक भाकरी देण्याची घोषणा केली. दुसऱ्या दिवशी सकाळी एका बगीच्यात सर्व मुले जमली. त्यांना भाकरी वाटणे सुरू झाले.

भाकरी लहान-मोठ्या होत्या. मुले गर्दी करून मोठी भाकरी मिळविण्याचा प्रयत्न करीत होती. फक्त एक मुलगी एकीकडे शांतपणे उभी होती. ती सर्वांच्या शेवटी पुढे आली. टोपल्यात एक लहानशी भाकरी उरली होती. तिने ती आनंदाने घेतली आणि घरी गेली.

दुसऱ्या दिवशी पुन: भाकरी वाटल्या जाऊ लागल्या. आजसुद्धा त्या मुलीला सर्वांत लहान भाकरी मिळाली. ती त्या मुलीने घरी आल्यावर खाण्यासाठी मोडली तेव्हा तिच्यातून सोन्याची एक मोहोर निघाली. तिची आई म्हणाली, 'जा, ही मोहोर त्या श्रीमंतास देऊन ये'.

मुलगी मोहोर देण्यास धावत गेली.

श्रीमंताने तिला पाहून विचारले, 'तू का आलीस ?'

मुलगी म्हणाली, 'माझ्या भाकरीत ही मोहोर निघाली. पिठात पडली असेल. म्हणून परत द्यायला आले. तुम्ही आपली मोहोर घ्या'.

श्रीमंत म्हणाले, 'नाही बाळ ! हे तुझ्या समाधानाचे बक्षीस आहे'.

'पण माझ्या समाधानाचे फळ तर मला आधीच मिळाले. मला भाकरीसाठी धक्के खावे लागले नाहीत'.

श्रीमंत फार प्रसन्न झाले. त्याने तिला आपली धर्मकन्या मानली आणि तिच्या आईला दरमहा पगार ठरवून दिला. तीच मुलगी मग त्याची वारस झाली.

असभ्य आचार्य

एका गावात एक मुलगा राहात होता. त्याच्या वडिलांनी त्याला शिकण्यासाठी काशीला पाठविले. त्याने शिकण्यासाठी खूप परिश्रम केले. ब्राह्मणाचा मुलगा होता. त्यामुळे बुद्धी तीव्र होती. काशीहून शिकून तो आपल्या गावी परत आला आणि व्याकरणाचा आचार्य झाला. गावात दुसरा कोणी शिकलेला नव्हता. सर्व लोक त्याचा आदर करीत. त्यामुळे त्याची घमेंड वाढली. एकदा त्या गावात एक वरात आली. त्या वरातीत दोन तीन म्हातारे पंडित होते. लग्नात शास्त्रार्थ तर होतोच. जेव्हा सर्व लोक बसले, तेव्हा शास्त्रार्थ करण्याची वेळ आली.

सर्वात प्रथम घमेंडी मुलानेच प्रश्न केला. पंडितांनी शांतपणे उत्तर दिले. पंडितांपैकी एकाने त्याला विचारले.

'असभ्य कोणास म्हणतात ?'

'जो मोठ्यांचा आदर करीत नाही, त्यांच्यासमोर उद्धटपणे वागतो, त्याला असभ्य म्हणतात'. मुलाने उत्तर दिले.

'आपण हे देखील मानाल की, असभ्य पुरुषाशी बोलणारा देखील असभ्यच असतो'.

'निश्चितच'. मुलाने उत्तर दिले.

'तर मी आपल्याशी बोलणे बंद करतो'. म्हातारे पंडित हसत हसत म्हणाले.

'म्हणजे ?' मुलगा रागाने लाल झाला.

'आपले पूज्य वडील तेथे मागे बसले आहेत आणि आपण येथे पुढे बसलात. एकदा तरी त्यांना बोलवायचे होते ?' पंडित म्हणाले.

'मी आचार्य आहे'. मुलगा जोरात म्हणाला.

पंडित हसत म्हणाले, 'आचार्य झाल्याने कोणी सभ्य होत नाही. आपण अजून बुद्धिमान लोकांची संगती केली नाही'.

मुलांच्या वडिलांनाच मुलापेक्षा अधिक लाज वाटली.

★ ★ ★

सर्वस्व दान

एक जुने मंदिर होते. त्याला भेगा पडल्या होत्या. एकदा खूप पाऊस पडला. जोरात वादळ झाले. मंदिराचा बराच भाग पडला. त्यादिवशी एक साधू पावसाचे वेळी त्या मंदिरात उतरला होता. सुदैवाने तो जेथे बसला होता, तो भाग पडला नाही. साधूला काही लागले नाही.

साधूने सकाळी गावात जाऊन वर्गणी जमविणे सुरू केले. त्याने विचार केला. 'मी राहात असताना देवाचे मंदिर पडले, तर ते दुरुस्त करूनच मी दुसरीकडे जावे'.

गावातील लोक श्रद्धाळू होते, त्यांनी साधूला बरीच वर्गणी दिली. साधू विद्वान होता. मंदिर तयार झाले. देवाची मोठ्या उत्साहाने पूजा झाली. भंडारा झाला. सर्वांनी आनंदाने प्रसाद घेतला. भंडाऱ्याच्या दिवशी संध्याकाळी सभा झाली. साधू महाराज देणगी देणाऱ्यांचे आभार मानण्यास उभे राहिले. त्यांच्या हातात एक कागद होता. त्यावर लांब यादी होती. ते म्हणाले, 'सगळ्यात मोठे दान एका म्हातारीने दिले. तिने ते स्वत: येऊन दिले होते'.

लोकांनी विचार केला, कोणा म्हातारीने शे-दोनशे रुपये दिले असतील. कित्येकांनी शंभर रुपये दिले होते. पण बाबांनी जेव्हा म्हटले की, 'त्या म्हातारीने मला पंचवीस पैसे आणि थोडेसे पीठ दिले'. तेव्हा सर्व आश्चर्यात पडले. लोकांना वाटले की, साधू गंमत करीत आहे. साधू पुढे म्हणाला, 'ती म्हातारी लोकांचे घरी कष्टाने धान्य दळून पोट भरते. हे पंचवीस पैसे तिने कित्येक महिन्यांनी एकत्र केले. हीच तिची सर्व बचत होती. मी त्या सर्वस्व दान करणाऱ्या श्रद्धाळू मातेस नमस्कार करतो.'

लोक नम्र होऊन त्यांनी आपल्या माना झुकविल्या. खरोखरच म्हातारीने मनापासून दिलेले हे सर्वस्व दानच सर्वांत मोठे दान होते.

जेव्हा डाकू रडला

दक्षिण अमेरिकेतील गोष्ट आहे. त्यावेळी तेथे सोन्याची खाण सापडली होती. दूरदूरचे व्यापारी आणि मजूर तेथे एकत्र आले होते. आधीच पिके कमी आली होती. त्यात बरेच बाहेरचे लोक आले. दुष्काळ पडला. खाण्या-पिण्याच्या, कपड्याच्या किंमती खूप वाढल्या. लोक सडक्या-नासक्या वस्तूंनी पोट भरू लागले. तापाची साथ होतीच, आता कॉलरा पसरला.

'मुक्तिसेना' नावाच्या पीडितांची सेवा करणाऱ्या संस्थेने आपली तुकडी तेथे पाठविली. त्या सेनेची संस्थापिका स्वत: तेथे आली. तिने लोकांना डाकूंचे भय दाखविले. पण 'मुक्तिसेना' तर सेवा करण्यासाठीच आली होती. त्यांची तुकडी न भिता पुढे गेली. झाडांच्या खाली तंबू ठोकले, त्यांचे डॉक्टर रोग्यांवर उपचार करू लागले.

एके दिवशी एक शस्त्रधारी घोडेस्वार आला. त्याने मुक्तिसेनेच्या संस्थापिकेला एक पत्र दिले आणि एक छान घोंगडे दिले. त्यावेळी तेथे एक चांगले घोंगडे फार महत्त्वाचे होते. तो घोडेस्वार पत्राचे उत्तर घेऊन परत गेला.

दुसऱ्या दिवशी एक सुंदर तरुण घोडेस्वार आला. तो त्या कीर्तिमान स्त्रीच्या पुढे गुडघे टेकून बसला. तो म्हणाला, 'आपण माझे घोंगडे स्वीकारून माझ्यावर मोठी कृपा केली. जी सर्वांची सेवा करीत आहे, तिने ह्या दुष्टाला एक लहानशी सेवा करण्याची संधी तर दिली'.

स्त्री म्हणाली, 'तुम्ही माझ्याबरोबर परमेश्वराच्या प्रार्थनेत सामील होणे पसंत कराल का ?'

तो ताबडतोब तयार झाला. लोक ज्याला दगडाच्या हृदयाचा, निर्दय समजत होते, तो डाकू त्या दिवशी प्रार्थनेत लहान मुलाप्रमाणे खूप रडला. तोच डाकूंचा प्रमुख होता.

★ ★ ★

मी मनुष्य बनेन

एकदा एका देवावर ब्रह्मदेव प्रसन्न झाले. त्या देवाला महर्षी दुर्वासांनी शाप दिला होता की, तू आता देव राहाणार नाहीस'. देव म्हणाला, 'देव नाही तर नाही. मी पुष्कळ दिवस देवरूपात राहिलो आहे. स्वर्गातील भोगांना मी कंटाळून गेलो आहे'. त्याने ब्रह्मदेवांची प्रार्थना केली. ब्रह्मदेव म्हणाले, 'तुम्ही जे म्हणाल, तेच तुम्हांला बनवून दिले जाईल. काही वेळ विचार करून देव म्हणाला, 'एकदा मला सगळे लोक पाहून येऊ द्या'.

ब्रह्मदेवाने मान्य केले. .तो देवलोकात काय पाहणार ? नृत्य व गायन करणारे गंधर्व, यक्ष, किन्नर - हे सर्व तर त्याचे सेवकच होते. इंद्राचे नंदनवन होते, पारिजातक वृक्ष होता, हे सर्व पुष्कळ वेळा पाहिलेच होते. त्यानंतरचे जनलोक, तपोलोक त्याने पाहिले. पुढे महर्लोक व सत्यलोक देखील पाहिले. वैकुंठ, साकेत, गोलोक व शिवलोक येथे त्याला जाण्याची आज्ञा नव्हती. त्याने विचार केला, 'ह्या लोकांमध्ये ऋषी बनून राहिलो तर तपस्या करावी लागेल. भोग येथे नाहीत. जन्मभर स्वर्गातील भोग मी भोगले. आता ह्या भानगडीत कोण पडेल ?'

तो सरळ पाताळाकडे गेला. दैत्यांच्या शक्तीची त्याने फार प्रशंसा ऐकली होती. नागलोक पाहताच तो भ्याला. मोठमोठे साप तेथे होते. दैत्य काळे, कुरूप, असभ्य होते. इतके कुरूप होण्याची त्याची इच्छा नव्हती. तो पृथ्वीवर आला.

'पक्षी झाला तर उडत फिरेन, वाटेल तेथली फळे खाऊ शकेन'. तो विचार करत होता. तेवढ्यात त्याने एक विमान पाहिले. 'ओहो ! हा तर मनुष्य आहे. ह्याला पण उडता येतंय'. त्याला अशी भीती वाटली की आपण पक्षी बनलो तर एखादा माणूस आपल्याला गोळी घालून ठार मारेल.

'मी पाण्यात राहीन' त्याने विचार केला. पण पाण्यात तर वर जहाज आणि खाली पाणबुडी चालत होती. माणसाची भीती येथेही होती. शिवाय पाण्यातील एक जीव दुसऱ्यावर सतत हल्ला करत असतात.

हत्ती, सिंह, सर्व बलवान पशू त्याने पाहिले. मनुष्य सर्वांना पकडून बंद करतो. सर्वांना नोकर बनवितो. तो रेल्वे व मोटार यांच्यात बसून धावतो.

पाणी आणि हवेत सुद्धा चालतो. पाणी, हवा, वीज यांच्याकडून कामे करवून घेतो. हजारो मैलांवरील आवाज त्याचवेळी ऐकू शकतो, गाणे ऐकतो, तेथले फोटो देखील पाहतो. मनुष्य मोठा बुद्धिमान आणि सुंदर आहे. तो असा विचार करीत परत आला.

ब्रह्मदेवाला त्याने विचारले, 'वैकुंठ, साकेत, गोलोक व शिवलोक कसे आहेत ? त्यांच्यात काय आहे ?'

'ते फार विचित्र लोक आहेत. तेथे येथील सूर्य-चंद्राचा प्रकाश नाही. ते स्वत:च प्रकाशित आहेत. तेथे भगवान आणि त्यांचे भक्त राहतात. तेथे नित्य सुख आणि सौंदर्य असते. दु:ख तर तेथे कोणाला माहीतच नसते'. ब्रह्मदेवाने सांगितले. देव ताबडतोब म्हणाला, 'मग मी....'

ब्रह्मदेवाने त्याला पुढे बोलूच दिले नाही. ते मध्येच म्हणाले, 'तेथे तर केवळ मनुष्यच आपल्या साधनेने आणि भक्तीने जाऊ शकतो'.

'तर मी मनुष्य बनेन' देवाने त्वरित म्हटले. त्याने विचार केला की, ब्रह्मदेव प्रसन्न झाले नसते तर तो काही बनू शकला नसता आणि मनुष्य तर देवसुद्धा बनू शकतो. ब्रह्मदेवाने त्याला मनुष्य बनविले व म्हटले.

'नर तन सम नहिं कवनिउ देही' - मनुष्यशरीरासमान कोणताही प्राणी नाही.

शिवी जवळच राहिली

एक मुलगा फार दुष्ट होता. तो कोणालाही शिवी देऊन पळून जात असे. एकदा एक साधूबाबा वडाच्या झाडाखाली बसले होते. तो मुलगा आला आणि त्यांना शिवी देऊन पळून गेला. त्याला वाटले, शिवी दिल्याने साधू चिडेल, मारायला धावेल, मग मजा येईल; पण साधू शांत बसून राहिले. त्यांनी त्याच्याकडे पाहिले सुद्धा नाही.

मुलगा अधिक जवळ आला आणि खूप जोरात शिव्या देऊ लागला. साधू आपल्या भजनात गुंग होते. कोणी कुत्रा भुंकत आहे किंवा कावळा काव

काव करीत आहे, त्याप्रमाणे ते समजले. एका दुसऱ्या मुलाने म्हटले, 'बाबाजी, हा आपणास शिव्या देत आहे ना ?'

साधू म्हणाला, 'होय, देतो तर आहे, पण मी त्या घेतो कोठे ? जर मी घेतच नाही, तर त्या सर्व परत त्याच्याजवळ राहतात'.

मुलगा म्हणाला, 'पण तो फार वाईट शिव्या देत आहे'.

साधू म्हणाला, 'ही तर आणखी वाईट गोष्ट आहे. पण मला त्यातली एकही शिवी चिकटली नाही. सर्वच्या सर्व त्याच्याच तोंडात आहेत. त्याचे तोंड घाणेरडे होत आहे'.

साधूचे बोलणे शिव्या देणारा मुलगा ऐकत होता. त्याने विचार केला, 'हा साधू खरंच सांगत आहे. मी दुसऱ्यांना शिवी देतो तेव्हा ते स्वीकारतात. त्यामुळे ते तळमळतात, मारायला धावतात आणि दुःखी होतात. हा शिवी घेतच नाही. त्यामुळे त्या सर्व माझ्याजवळ राहिल्या. अरेरे ! माझ्याजवळ किती घाणेरड्या शिव्या आहेत !

शेवटी तो साधूजवळ जाऊन म्हणाला, 'बाबाजी ! मी अपराधातून कसा मुक्त होईन आणि माझे तोंड शुद्ध कसे होईल ?'

साधू म्हणाला, 'पश्चात्ताप केल्याने तू अपराधातून मुक्त होशील. पुनः कोणालाही शिव्या न देण्याची प्रतिज्ञा करावी. तसेच रामनामाचा जप केल्याने तोंड शुद्ध होईल'.

मोठ्यांचे म्हणणे ऐका

एक फार मोठे जंगल होते. जवळच एक डोंगर होता आणि त्यात निर्मळ, थंड पाण्याचे झरे होते. जंगलात बरीच जनावरे राहात. डोंगराच्या गुहेत एक सिंह, सिंहीण आणि त्यांची दोन पिले राहात होती. सिंह-सिंहीण पिलांवर फार प्रेम करीत असत.

जेव्हा सिंहाची पिले आईवडिलांबरोबर जंगलात जायची, तेव्हा तेथील

इतर जनावरे त्यांना पाहून पळून जात. पण सिंह-सिंहीण त्यांना फार कमी वेळा बरोबर नेत. ते पिलांना गुहेत सोडून शिकार शोधण्यास जात असत.

ते दोघेही पिलांना नेहमी समजावून सांगत की, चुकूनही गुहा सोडून एकटेच बाहेर जाऊ नका. पण मोठ्या पिलास ही गोष्ट आवडत नव्हती. एके दिवशी त्यांचे आईवडिल जेव्हा जंगलात गेले होते, तेव्हा मोठ्या पिलाने लहानास म्हटले, 'चल, झऱ्यावर जाऊ, पाणी पिऊ, जंगलात थोडे हिंडू, हरणांना घाबरविण्यात मला फार मजा वाटते.' छोटा म्हणाला, 'बाबांनी सांगितले आहे की, एकटे गुहेतून निघू नका. झऱ्याजवळ जाण्यास त्यांनी मना केले आहे. तू थांब, त्यांना येऊ दे. आपण त्यांच्याबरोबर जाऊन पाणी पिऊ'.

मोठे म्हणाले, 'मला तहान लागली आहे. सर्व जनावरे तर आपल्यालाच भितात, तेव्हा आपण कशाला भ्यायचं ?'

छोटा एकटा जाण्यास तयार झाला नाही. तो म्हणाला, 'मी तर आईबाबांचे म्हणणे ऐकेन. मला एकटे जांण्यास भीती वाटते'. मोठा म्हणाला, 'तू भित्रा आहेस, नको येऊस, मी तर जातो'. तो गुहेतून निघाला, झऱ्याजवळ गेला. पोटभर पाणी प्याला. मग हरणांना शोधत इकडे-तिकडे हिंडू लागला.

त्या दिवशी त्या जंगलात काही शिकारी आले होते. त्यांनी दुरून ह्या सिंहाच्या पिलास पाहिले आणि याला पकडून एखाद्या प्राणिसंग्रहालयास विकले तर बरेच पैसे येतील, असा त्यांनी विचार केला. सर्व शिकाऱ्यांनी त्या पिलास घेरले आणि त्याच्यावर त्यांनी हल्ला केला. त्याच्यावर घोंगडे आणि कपडे टाकून शिकाऱ्यांनी त्याला पकडले.

बिचारा तो एकटा काय करणार ? तो अजून कुत्र्याएवढा ही मोठा झाला नव्हता. त्याला घोंगडीत लपेटून त्यांनी दोरीने बांधले होते. तो हातपाय हलवू शकत नव्हता आणि गुरगुरही करू शकत नव्हता.

शिकाऱ्यांनी त्याला एका प्राणिसंग्रहालयास विकून टाकले. तेथे त्याला एका लोखंडी पिंजऱ्यात कोंडले गेले. तो फार दुःखी होता. त्याला आईवडिलांची आठवण येई. तो पुनः पुनः गुरगुरत असे. लोखंडी पिंजऱ्याला ओरबाडत असे. पण त्याने पिंजरा थोडाच तुटतो ? जेव्हा तो एखाद्या लहान मुलास पाहात असे, तेव्हा गुरगुरत असे व उसळत असे. त्याला जर माणसाची

भाषा आली असती तर त्याने जरूर म्हटले असते, 'तुम्ही आपल्या आईवडिलांची, वडिलधाऱ्यांची आज्ञा अवश्य पाळा. न पाळल्यास पश्चाताप करावा लागतो. बघा ! मी त्यांची आज्ञा न पाळल्यामुळे येथे बंदी झालो आहे. खरेच आहे -

जे सठ निज अभिमान बस सुन हिंन गुरुजन बैन।
ते जग महँ नित लहहिं दुख कबहुँ न पावहिं चैन।।

जे दुष्ट आपल्या अभिमानाने मोठ्यांची आज्ञा पाळत नाहीत, ते जगात नेहमी दु:ख भोगतात. त्यांना कधी शांतता मिळत नाही.

स्वच्छता

एका शेतकऱ्याने एक मांजरी पाळली होती. पांढऱ्या कोमल केसांची ती मांजरी रात्री त्याच्या खाटेवर त्याच्या पायांपाशी झोपत असे. तो शेतातून आला की त्याच्याजवळ ती धावत यायची, त्याच्या पायावर आपले अंग घासायची, आपले प्रेम दाखवायची, म्याऊँ म्याऊँ करून. शेतकरी तिला रोज थोडे दूध आणि पोळी खाऊ घाली.

एके दिवशी शेतकऱ्याचा मुलगा त्यांना म्हणाला, 'बाबा ! मी आज रात्री तुमच्याजवळ झोपेन'.

शेतकरी म्हणाला, 'नाही, तुला वेगळ्या खाटेवर झोपावे लागेल'.

मुलगा म्हणाला, 'तुम्ही मांजरीला जवळ घेऊन झोपता, तर मग मला का नाही तुमच्याजवळ झोपू देत ?'

शेतकरी म्हणाला, 'तुला खरूज झाली आहे, तुझ्याबरोबर झोपलो तर मलाही होईल. अगोदर तुझी खरूज बरी होऊ दे'.

मुलगा खरजेने फार त्रासला होता. त्याच्या पूर्ण शरीरावर लहान लहान फोड आले हाते. तो खाजेने बेचैन व्हायचा. तो म्हणाला, 'ही खरूज मलाच का झाली ? ह्या मांजरीला का नाही ?'

शेतकरी म्हणाला, 'उद्या सकाळी मी तुला याचे उत्तर देईन'.

दुसऱ्या दिवशी त्याने त्या मांजरीला रोजच्यापेक्षा थोडे अधिक दूध आणि पोळी दिली. तिचे पोट भरल्यावर दूध व पोळी शिल्लक राहिली, ती तिने टाकून दिली. दूर जाऊन, उन्हात बसून वारंवार आपला एक पाय चाटून, ती आपल्या तोंडावर फिरवू लागली.

शेतकऱ्याने आपल्या मुलास तेथे बोलाविले व म्हटले, 'बघ, मांजरी कशी आपले तोंड स्वच्छ करीत आहे. तसेच ती आपले शरीर स्वच्छ ठेवते. त्यामुळे तिला खरूज होत नाही. तू आपले शरीर आणि कपडे मळके ठेवतोस, त्यामुळे खरूज होते. मळामध्ये एक प्रकारचे विष असते. ते घामाबरोबर जेव्हा शरीराच्या कातडीस लागते व आत जाते, तेव्हा खरूज, फोड आणि इतरही रोग होतात'.

मुलगा म्हणाला, 'मी आज माझे सर्व कपडे गरम पाण्यात उकळून धुईन. अंथरूण, चादरसुद्धा स्वच्छ करीन. खूप वेळ आंघोळ करीन. त्याने माझी खरूज बरी होईल'.

शेतकऱ्याने सांगितले, शरीराबरोबरच पोटसुद्धा साफ ठेवले पाहिजे. मांजरीचे पोट भरले, तेव्हा तिने दूधसुद्धा सोडून दिले. पोट भरले की मग खाऊ नये. पोट बिघडेल असे पदार्थ खाऊ नयेत. तिखट, आंबट, बाजारी चाट, जास्त गोड पदार्थ खाण्याने व चहा प्याल्याने पोट बिघडते. ते साफ राहात नाही. जे जिभेच्या थोड्याशा चवीसाठी, भूक नसताना जास्त खातात किंवा तळलेले पदार्थ, मिठाई, दहीवडे वगैरे नेहमी खातात, त्यांना खरूजच नव्हे.तर आणखी अनेक प्रकारचे आजार होतात. पोट साफ ठेवण्यासाठी कोंड्यासह पिठाची पोळी, हिरव्या भाज्या आणि मोसमी स्वस्त फळे अधिक खावीत'.

त्याच्या मुलाने त्या दिवसापासून कपडे स्वच्छ ठेवणे सुरू केले. तो रोज शरीर रगडून स्नान करू लागला. पोट बिघडेल असे पदार्थ खाणे आणि जरुरीपेक्षा अधिक खाणे त्याने सोडून दिले. त्याची खरूज बरी झाली. आता तो निरोगी आणि बलवान झाला आहे. त्याचे वडील आणि इतर लोकही त्याला प्रेमाने जवळ बसवितात.

★ ★ ★

श्रद्धेशिवाय सिद्धी नाही

एक बाबूजी होते. इंग्रजी शिकलेले, कोट, बूट, हॅट, पँट घालणारे. ते नेहमी इंग्रजीच बोलत असत. नोकरावर रागावले तरी इंग्रजीत शिव्या देत. कुत्र्यावर प्रसन्न झाले तर इंग्रजीत आशीर्वाद देत.

त्यांना एक मुलगा होता. दुर्दैवाने तो आजारी पडला. डॉक्टर आले, इंजेक्शन देऊन गेले. वैद्य, हकीम आले, गोळ्या देऊन गेले. पण गुण आला नाही. त्याचा आजार वाढतच गेला.

एके दिवशी एक साधू आले. ते म्हणाले, 'हनुमंताला शेंदूर लावा व सव्वा शेर लाडूंचा नैवेद्य दाखवा, तर मुलगा बरा होईल.' बाबूजी म्हणाले, 'मी दगडाला दगडच समजतो. पण तुम्ही म्हणताच आहात तर, हनुमंताला शेंदूर लावून लाडूचा नैवेद्य दाखवून आणीन'. मुलगा बरा होईल या आशेने ते इतके करून आले. पण मुलाला गुण आला नाही.

सकाळी बाबूजी साधूकडे गेले, म्हणाले, 'मुलगा बरा झाला नाही'. साधू म्हणाले, 'आणा, शेंदूर, तूप, मिठाई, फूल, उदबत्ती. मीच पूजा करून येतो'.

त्यांनी हनुमंताची पूजा केली आणि थोडासा प्रसादाचा शेंदूर मुलास लावला. मुलगा एकदम उठून बसला. त्याचा ताप उतरला. बाबूजींनी आश्चर्याने म्हटले, 'तुमच्या पूजेने हा बरा झाला, माझ्या पूजेने का नाही ?'

'तुम्ही पूजाच कोठे केली ?' साधू म्हणाला.

'मी पूजा तर केली'. बाबूजी म्हणाले.

'श्रद्धेशिवाय केलेली पूजा, पूजा कशी आणि पूजेशिवाय आजार कसा बरा होईल ?'